RAMVICHAR
# रामविचार
*Volume No. 38 * Issue No.197 * Tuesday Date 08 March 2022 * Marathi Daily *JALNA * Rate 1 Rupees * Pages - 4

# ओबीसी आरक्षण विधेयक विधानसभेत मंजूर

**मुंबई,७ मार्च**
अविधीमंडळात ओबीसी आरक्षणाचे विधेयक एकमताने मंजूर करण्यात आले आहे. प्रभागरचना, निवडणुकीच्या तारखा ठरवण्याचे अधिकार सरकारकडे देण्यात आले असून राज्यात मध्य प्रदेश पॅटर्नप्रमाणे ओबीसी आरक्षणाचे विधेयक मंजूर झाले आहे.
निवडणुकीच्या तारखांसंदर्भात राज्य सरकारसोबत निवडणूक आयोग सल्लामसलत करूनच निर्णय घेईल, अशी सुधारणा विधेयकात करण्यात आली आहे. आमदार सुनील प्रभू यांनी सुधारणा विधेयक अधिवेशनात मांडले. मुंबई महानगरपालिका महाराष्ट्र नगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी सुधारणा विधेयक सभागृहात एकमताने मंजूर करण्यात आले आहे.
ओबीसीच्या आरक्षणासंदर्भात मध्यप्रदेशमध्ये ट्रिपल टेस्टची अडचण आली. ट्रिपल टेस्ट शिवाय आरक्षण देता येणार नाही हा निकाल सर्व देशाला लागू झाल्यामुळे महाराष्ट्रात ओबीसीशिवाय काही ठिकाणी निवडणूक झाली. तोच कायदा मध्यप्रदेश, ओरिसा, कर्नाटकालाही लागू झाला. मध्य प्रदेशने त्यावेळी अध्यादेश काढला. सरकारने निवडणूक आयोगाचे काही अधिकार स्वत:कडे घेतले. प्रभाग रचना करणे, कुठे आरक्षण देता येईल ते ठरवणे आदी अधिकार मध्य प्रदेशाने स्वत:कडे घेतले. केवळ निवडणूक घेण्याचे अधिकार निवडणूक आयोगाकडे ठेवले. त्यामुळे त्यांना वेळ मिळाला. प्रभाग ठरवणे आणि पुनर्रचना करणे यात वेळ मिळाल्यामुळे ते आता इम्पिरिकल डेटा गोळा करत आहेत.
ओबीसी आरक्षणाबाबत मध्य प्रदेश सरकारने मोठा निर्णय घेतला. राज्यात सरळसेवा भरतीमध्ये राज्य स्तरावर तसेच जिल्हास्तरावरील पदांमध्ये ७३ टक्के आरक्षण करण्यात आले आहे. सरकारने गेल्या महिन्यातच यासंबंधीचे आदेश जारी केला आहे. मध्य प्रदेशमध्ये आता ७३ टक्के आरक्षण देण्यात आले आहे. उमेदवारांना सरळसेवा पद भरतींमध्ये याचा लाभ होणार आहे. यात अनुसूचित जातींना १६ टक्के, अनुसूचित जमातींना २० प्रतिशत, ओबीसींना २७ टक्के तर आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या म्हणजे अल्प उत्पन्न गटासाठी १० टक्के आरक्षण लागू करण्यात आले आहे. या आदेशानुसार ओबीसींचे आरक्षण ८ मार्च २०१९ आणि ईडब्ल्यूएससाठीचे आरक्षण २ जुलै २०१९ पासून लागू असल्याचे म्हटले आहे. या सर्व पदांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे.
ओबीसी आरक्षण मध्य प्रदेश सरकारने १४ टक्क्यांहून वाढवत २७ टक्के केले (पान ३ वर)

## उच्च न्यायालयाने फटकारल्यानंतर महाराष्ट्र सरकार मागे हटले

# मास्क न घातल्यास दंड नाही,आतापर्यंत वसूल केलेला सर्व दंड परत करावा लागेल

**मुंबई,७ मार्च**
मुंबई उच्च न्यायालयाने फटकारल्यानंतर महाराष्ट्र सरकार मागे हटले असुन मास्क न घातल्यास दंड नाही,आतापर्यंत वसूल केलेला सर्व दंड परत करावा लागेल.तसेच दोषी मुख्य सचिव सीताराम कुंटे, बीएमसी मार्शल, आयुक्त इक्बाल चहल, सुरेश काकाणी यांच्यावर आयपीसी ३८४, ३८५, ४२०, ४०९, १२० (बी), १०९, ५२ इत्यादी कलमांखाली कारवाई केली जाईल असे इंडियन बार असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष अधिवक्ता नीलेश ओझा यांनी सांगितले.

'अवेकन इंडिया मूव्हमेंट' (एआयएम) आणि 'इंडियन बार असोसिएशन' (आयबीए) यांच्या प्रयत्नांना मोठे यश मिळाले.
मुख्य सचिव सीताराम कुंटे यांचे आदेश बेकायदेशीर असल्याचे सांगत मुंबई उच्च न्यायालयाने सरकारला फटकारले. आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मध्ये मास्क न घातल्यास दंड आकारण्याची कोणतीही तरतूद नाही. परंतु महाराष्ट्राचे माजी मुख्य सचिव सीताराम कुंटे यांनी पदाचा गैरवापर करत महाराष्ट्रातील नागरिकांना मास्क न घातल्याबद्दल २०० रुपये आणि नंतर ५०० रुपये दंड ठोठावण्याचा बेकायदेशीर आदेश जारी केला.
लसीच्या सक्तीच्या आदेशाविरुद्ध जनहित याचिका (पीआयएल) सुनावणी सुरू असताना ही बाब उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. ही याचिका श्री. फिरोज मिठीबोरवाला आणि श्री. योहान टेंग्रा यांनी दाखल केला होता. मुख्य सचिव सीताराम कुंटे यांना आदेश देण्याचा अधिकार नसून (पान ३ वर)

## लसीकरणाच्या जनजागृतीसाठी चित्ररथाद्वारे प्रसार

**जालना,७ मार्च**
जालना जिल्ह्यात कोव्हीड प्रतिबंधात्मक लसीकरणाच्या जनजागृतीसाठी जिल्हा माहिती कार्यालयाच्या

पुढाकाराने तयार करण्यात आलेल्या चित्ररथास जिल्हाधिकारी डॉ.विजय राठोड यांनी आज (७ मार्च) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात हिरवी झेंडी दाखवुन व फित कापुन जनजागृतीच्या विशेष मोहिमेचा शुभारंभ केला.
यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अर्चना भोसले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विवेक खतगावकर, जिल्हा लसीकरण अधिकारी श्रीमती जयश्री भुसारे, जिल्हा माहिती अधिकारी प्रमोद धोंगडे आदींची उपस्थिती होती.
जालना जिल्ह्याच्या आठ (पान ३ वर)

# जोपर्यंत ओबीसी आरक्षण लागू होत नाही तोपर्यंत निवडणुका घेऊ नका : समता परिषद

**जालना,७ मार्च**
अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने आज सोमवार दिनांक ७ मार्च २०२२ रोजी ओबीसी समाजाचे स्थानिक स्वराज्य संस्थेतील आरक्षण पूर्ववत करावे तसेच जोपर्यंत ओबीसी आरक्षण लागू होत नाही तोपर्यंत निवडणुका घेऊ नयेत या मागणीचे निवेदन जालन्याचे अप्पर जिल्हाधिकारी केशव नेटके यांना देण्यात आले. मा. सर्वोच्च न्यायालयाने विकास गवळी केस अनुषंगाने अस्तित्वात असलेले इतर मागासवर्गीय समूहासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील २७ टक्के आरक्षण रद्द केले आहे. सरकारने अहवाल सर्वोच्च न्यायालयात सादर

मागासवर्ग आयोगाचा अंतरिम अहवाल प्रायोगिक, अभ्यास व केला होता परंतु मा. न्यायालयाने हा संशोधना शिवाय (पान ३ वर)

## उदय ट्रॅक्टर्स येथे बुकिंग सुरू

### सोनालिका च्या अत्याधुनिक ट्रॅक्टर सह रिपेरिंग्ची सुविधा

**जालना,७ मार्च**
कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात असलेल्या भाजी मार्केट शेजारी उदय ट्रॅक्टर्स सेल्स व रिपेरिंग सर्व्हिस येथे सोनालिका च्या अत्याधुनिक ट्रॅक्टरची बुकिंग सुरू झाली असून उद्या बुधवारी ( ता. ०९) प्रत्यक्ष डिलिव्हरी सुरु होणार असल्याची माहिती उदय चे संचालक नारायणराव गजर पाटील यांनी दिली.
शेतकरी बांधवांसाठी सोनालिका कँमनी ने आधुनिक पद्धतीने विकसित केलेले ट्रॅक्टर उपलब्ध व्हावे यासाठी आपण गेली वर्षभर पाठपुरावा करत होतो अखेर कँमनीने मान्यता दिली असून शोरूमचा अधिकृत उद्दघाटन सोहळा येत्या पाडव्याच्या शुभमुहूर्तावर शिवसेना नेते, माजी मंत्री तथा कृषी उत्पन्न

बाजार समितीचे सभापती अर्जुन खोतकर यांच्या हस्ते होईल. यावेळी उपसभापती भास्कर दानवे , बाजार समितीचे सचिव रजनीकांत इंगळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार असल्याचे सांगून सध्या ट्रॅक्टर च्या सर्व प्रकारची दुरुस्ती केली जात आहे तरी नवीन ट्रॅक्टर घेऊ इच्छिणाऱ्यांनी कंपनी (पान ३

## शहराचा सर्वांगिण विकास हेच ध्येय : आ.कैलाश गोरंट्याल

**जालना,७ मार्च**
जालना शहरातील अंतर्गत सर्वच रस्ते सिमेटचे करण्यावर आपला भर असून, शहराचा विकास हेच

(छायाचित्र- मजहर सौदागर)

एकमेव ध्येय आहे. यासाठी नागरिकांनी आगामी काळात येणाऱ्या पालिका निवडणूकीत काँग्रेसच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहावे असे आवाहन आमदार कैलाश गोरंट्याल यांनी केले.
जालना शहरातील प्रभाग क्रमांक ७ मध्ये कोठारीनगर, गोपालनगर, श्रीकृष्ण रूख्मिनीनगर, श्री विश्वकर्मा मंदीर परिसरातील बजरंगबली मंदीर (पान ३ वर)

## नवाब मलिकांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

**मुंबई,७ मार्च**
राज्याचे अल्पसंख्यांक मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांना दिलासा नाहीच. नवाब मलिक यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे. न्यायालयीन कोठडी मिळताच नवाब मलिकांची रवानगी आता आर्थर रोड कारागृहात होणार आहे.
मुंबई सत्र न्यायालयातील विशेष पीएमएलए कोर्टानं नवाब मलिक यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. त्यांना २१ मार्चपर्यंत कारागृहात ठेवण्याचे निर्देश कोर्टानं दिले आहेत. मनी लॉंड्रिंग प्रकरणी नवाब मलिक यांची रिमांडमधील चौकशी पूर्ण झाल्याची माहिती ईडीने झचङअ कोर्टात दिली.
दाऊद इब्राहिमशी संबधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात नवाब मलिक यांना ९ तास चौकशी केल्यानंतर अटक करण्यात आली होती. ईडीनं मलिक यांना २३ फेब्रुवारीला मनी लॉंड्रिंग प्रकरणात अटक केली होती. त्यानंतर त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले होते.
यानंतर न्यायालयानं नवाब मलिक यांना ३ मार्चपर्यंत ईडी कोठडी सुनावली. ही कोठडी संपल्यानंतर त्यांना पुन्हा कोर्टात हजर करण्यात आलं. तेव्हा त्यांना पुन्हा न्यायालयानं ७ मार्चपर्यंत ईडी कोठडी सुनावली होती. आज मलिक यांना पुन्हा (पान ३ वर)

## वनराईकडून चार वर्गखोल्या उभारल्या

**बदनापूर,७ मार्च**
तालुक्यातील बाजारवाहेगाव येथील जिल्हा परिषदेच्या प्राथामिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी चार वर्ग खोल्या बांधून देण्यात आले. या वर्गखोल्याचे उद्घाटन

उत्साहात पार पडले. वनराईच्या वतीने वर्ग खोल्या उभारून दिल्याबददल गावकऱ्यांमध्येही उत्साह आहे. ग्रामीण भागात प्राथामिक शिक्षणाचा दर्जा दिवसेंदिवस खालावत असल्याचे उदाहरणे आहेत. शालेय शिक्षणाकडे म्हणावे तसे लक्ष देण्यात येत असल्याच्या तक्रारी असतात. मात्र, वनराई या संस्थेने ग्रामीण भागातील शिक्षणाचे महतत्व ओळखून शालेय विद्यार्थ्यांना सोयीसुविधा पुरवण्याचे (पान ३ वर)

## नारी शक्तीत समृद्ध राष्ट्र निर्मितीची धमक : अर्चना शर्मा

### लायन्स क्लबच्या 'जननी को सलाम' कार्यक्रमाला प्रचंड प्रतिसाद

**जालना,७ मार्च**
नारी शक्तीचा योग्य पद्धतीने वापर झाल्यास एक समृद्ध राष्ट्र निर्मिती शक्य असून, अशा देशाची प्रगती कोणीही रोखू शकणार नाही. त्यासाठी महिलांकडे एक सशक्त नारी शक्ती म्हणून पहा. स्त्री निरोगी असेल तर मुले सशक्त आणि परिवार सुखी बनतो, तिला तिच्या अधिकाराचा, स्वातंत्र्याचा उपभोग घेऊ द्या, असा मौलिक सल्ला मुंबई येथील प्रसिद्ध मॉडेल तथा अभिनेत्री अर्चना शर्मा यांनी येथे बोलताना दिला.
जागतिक महिला दिनानिमित्त लायन्स क्लब ऑफ जालना आणि रोटरी क्लब ऑफ जालना इलाईट यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी मधुर बँक्वेट हॉलमध्ये आयोजित जननी को सलाम या कार्यक्रमात

अर्चना शर्मा यांनी महिला कर्तबगारीचा इतिहास उलगडून सांगितला. यावेळी त्यांचा क्लबच्यावतीने गार्गी पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. व्यासपीठावर उपप्रांतपाल लॉ. पुरुषोत्तम जयपुरिया, लायन्स क्लबच्या अध्यक्षा लॉ. मीनाक्षी दाड़, कोषाध्यक्ष लॉ. प्रेमलता लोया, रोटरी क्लब (पान ३ वर)

## ०१ पॉझिटीव्ह, ०३ डिस्चार्ज

**जालना,७ मार्च**
जिल्हा शल्य चिकित्सक, जालना यांनी दिलेल्या अहवालानुसार डेडीक्टेड कोवीड हॉस्पीटल, डेडीक्टे कोवीड हेल्थ सेंटर, कोवीड केअर सेंटरमधील ०३ रुग्णास डिस्चार्ज देण्यात आला आहे तर जालना जिल्ह्यात जालना शहर -१ , मंठा तालुक्यातील - निरंक, परतुर तालुक्यातील निरंक, घनसावंगी तालुक्यातील निरंक अंबड तालुक्यातील निरंक, बदनापुर तालुक्यातील निरंक, जाफ्राबाद तालुक्यातील निरंक, भोकरदन तालुक्यातील निरंक, इतर जिल्ह्यातील यवतमाळ -१ अशा प्रकारे आरटीपीसीआरद्वारे ०१ तर अँटीजेन तपासणीद्वारे ०० असे एकुण ०३ व्यक्तीचा अहवाल पॉझिटिव्ह आला असल्याची माहिती जिल्हा शल्य चिकित्सक यांनी दिली आहे.
जिल्ह्यात एकुण संशयीत रुग्ण- ७२३७६ असुन सध्या रुग्णालयात- ०७ व्यक्ती भरती आहेत, एकुण भरती केलेल्या व्यक्ती- १४२५३ दैनिक लाळेची तपासणी केलेली संख्या- ३७० एवढी तर एकुण तपासणी केलेल्या लाळेच्या नमुन्यांची संख्या- ७९३०२५ एवढी आहे. प्रयोगशाळेकडुन अनिर्णीत नमुने-२७८, दैनिक पॉझिटीव्ह नमुने -०१, असुन एकुण पॉझिटीव्ह आलेल्या अहवालाची संख्या- ६७५१३ एवढी आहे. एकुण निगेटीव्ह नमुन्यांची संख्या- (पान ३ वर)

## महिलांसाठी उद्योगांच्या संधी मार्गदर्शन वेबिनारचे ९ मार्च रोजी आयोजन

**जालना,७ मार्च**
जागतिक महिला दिनाच्या व स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमित्ताने जालना जिल्ह्यातील महिलांना विविध उद्योग संधी, होणारे बदल व महिलांनी उद्योग-व्यवसाय सुरू कसा करावा या बाबत उद्योजकता प्रेरणा आणि मार्गदर्शन होण्यासाठी चला उद्योजक होऊ या! या नाविन्यपुर्ण उद्योजकता अभियानातंर्गत महिलांसाठी उद्योगांच्या संधी या विषयावर ऑनलाईन मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ९ मार्च २०२२ बुधवार रोजी दुपारी ४ वाजता करण्यात आले आहे. सदर कार्यक्रम फेसबूकच्या माध्यमातून कार्यालयाच्या https://www.facebook.com/JalnaSkillDevelopment या फेसबुक पेजवरून थेट ऑनलाईन प्रक्षेपित करण्यात येणार आहे. यामध्ये श्री भोलेश्वर फळ व भाजीपाला प्रक्रिया उद्योग सिंधी काळेगांव, जालना. च्या संचालिका, कृषि उद्योजक, तज्ञ व अनुभवी मार्गदर्शक श्रीमती सिताबाई मोहिते, आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, (MCED) जालना च्या प्रकल्प अधिकारी, श्रीमती भारती सोसे, ह्या वेबीनारद्वारे मार्गदर्शन करणार आहेत.
जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना व औरंगबाद आणि थिंक शार्प फाउंडेशन, पुणे यांचे संयुक्त विद्यमाने चला उद्योजक होऊ या! या नाविन्यपुर्ण उद्योजकता अभियानातंर्गत प्रत्येक महिन्यात किमान एकदा, साधारणपणे दुस-या आठवड्यात दुस-या मंगळवारी फेसबुक पेज https://www.facebook.com/JalnaSkillDevelopment यावरून विनामुल्य ऑनलाईन मार्गदर्शन वेबिनार शृंखला सुरू करण्यात आलेली आहे.
हा कार्यक्रम या कार्यालयाचे अधिकृत फेसबुक पेज https://www.face (पान ३ वर)

## कन्यादान योजनेचे प्रस्ताव सादर करा

**जालना,७ मार्च**
महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत व इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत सामुहिक विवाह सोहळ्यात भाग घेऊन विवाह करणा-या अनुसुचित जाती (नवबौध्दासह) विभाभज, इमाव व विमाप्र दाम्पत्यासाठी कन्यादान योजना राबविण्यात येत आहे.
या योजनेनुसार सामुहिक विवाह सोहळ्यात भाग घेऊन विवाह करणा-या वधूचे वडील, आई किंवा पालक यांच्या नावावर २० हजार रुपये अनुदार क्रॉस चेकने देण्यात येते. सामूहिक विवाह सोहळा आयोजित करणा-या स्वयंसेवी संस्थेस प्रति पात्र जोडपे ४ हजार रुपये प्रोत्साहनत्मक अनुदान देण्यात येते. तसेच वराचे वय २१ वर्ष व वधूचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे.
सन २०२१-२२ या वर्षासाठी सामुहिक विवाह सोहळे आयोजित करणा-या जास्तीत जास्त स्वयंसेवी संस्थांनी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन जालना येथे प्रस्ताव सादर करावेत. तसेच कोव्हिड -१९ च्या प्रादुर्भावामुळे सामुहिक विवाह सोहळा आयोजित करतांनी सक्षम प्राधिकारी यांची संमती आवश्यक राहील याची नोंद घेण्यात यावी. या योजनेचा लाभ लाभार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

**** महत्वाचे ****

## आ. रवी राणा यांचा विधानसभेत फाशी घेण्याचा इशारा

**मुंबई,७ मार्च**
अमरावती पालिका आयुक्तांवर शाईफेक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झालेले भाजप आमदार रवी राणा यांनी सोमवारी विधिमंडळाच्या परिसरात राज्य सरकारचा निषेध केला. यावेळी बोलताना त्यांनी थेट फाशी घेण्याचा इशारा दिला आहे. यामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून शिवरायांच्या पुतळ्यावरुनही त्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.
'शिवरायांचा पुतळा आम्ही बसवला आणि दुग्धाभिषेक झाला. शिवप्रेमींनी आराधना केली आणि पाच दिवसानंतर उड्डाणपुलावरुन पुतळा काढून टाकण्यात आला. छत्री आणि हातोड्याने हा पुतळा काढण्यात आला आणि गोडाऊनमध्ये ठेवण्यात आला. आमच्या आराध्य दैवताला गोडाऊन टाकत असतील तर शिवभक्तांच्या भावना दुखावतीलच. पण काही शिवभक्तांनी मनपा आयक्तांवर शाई फेकली, तेव्हा मी दिल्लीत होतो. मला बैठकीत असताना फोन आला आणि तुमच्यावर अमरावतीत ३०७ चा गुन्हा दाखल झाल्याचं सांगण्यात आलं' असा खुलासा रवी राणा यांनी केला आहे.
यावेळी बोलताना ते म्हणाले की, 'पोलीस आयुक्त सांगतात, सरकारमधल्या लोकांनी हा गुन्हा दाखल करायला लावला. यानंतर १०० ते १५० पोलीस घरी गेले, वृद्ध आई होते, घरात घुसून तपासणी केली. खासदारांचाही अपमान करण्यात आला. या राज्याचे गृहमंत्री, मुख्यमंत्री यांनी आयुक्तांना फोन केला आणि गुन्हा दाखल करायला लावला. रवी राणांना अटक करायचे आदेश दिले. मला आज आर आर आबांची आठवण येते. तुमचीही लवकरच अनिल देशमुख सारखी परिस्थिती निर्माण होईल. आरती सिंग पोलीस आयुक्त आहेत. त्यांनी माझ्यावर रात्री साडेदहा वाजता गुन्हा दाखल झाला. त्यासाठी आमच्यावर दबाव असल्याचं पोलीस आयुक्तांनी सांगितलं. यामुळे जर न्याय मिळाला नाही तर मी इथेच फाशी घेईल' असा इशारा त्यांनी केला आहे.
यावेळी रवी राणा यांनी एक फलक झळकावून आपल्यावरील अन्यायाविरोधात दाद मागितली. तसेच याविषयी विधीमंडळामध्ये समिती निर्माण करा तर मनपा आयुक्त प्रवीण आष्टीकर आणि पोलीस आयुक्त आरती सिंग यांचे निलंबन करण्याची मागणीही रवी राणा यांनी केली.

## पत्नीच्या हत्यारा २२ वर्षानंतर गजाआड

**ठाणे,७ मार्च**
पत्नीच्या हत्येप्रकरणी शिक्षा भोगत असलेला पती बडोदा जेलमधून पॅरोलवर १९९९ साली बाहेर आला. तेव्हापासून तो पोलिसांना गुंगारा देत, तब्बल २२ वर्ष उल्हासनगर शहरात राहत होता. मात्र, गुन्हे शाखा पथकाला त्याची माहिती मिळताच आज ( सोमवार ) पहाटेच्या सुमारास त्याला अटक केली आहे. रमेश उर्फ दिनेश उत्तम तायडे ( वय ५३ ) असे अटक केलेल्या कैद्याचे नाव आहे.
आरोपी रमेश उर्फ दिनेश तायडे हा गुजरात राज्यातील सुरत शहरात पत्नीसह राहत होता. त्यातच १९९५ साली पती पत्नीमध्ये घरगुती वाद झाले होते. त्याच वादातून त्याने पत्नीला जिवंत जाळले. त्यावेळी सुरत शहरातील लिबांयत पोलीस ठाण्यात त्याच्या विरोधात भादवि. कलम ४९८(अ) ए, ३०२ प्रमाणे गुन्हा नोंद करून त्याला अटक केली होती. त्यानंतर सुरत न्यायालयाने त्याला जन्मठेपची शिक्षा ठोठावली आहे. तेव्हापासून तो गुजरात राज्यातील बडोदा कारागृहात शिक्षा भोगत होता. पण, जेलमध्ये शिक्षा भोगत असताना त्याला २७ सप्टेंबर १९९९ रोजी पॅरोलवर रजा मिळाली होती. त्यानंतर रजा संपली तरी तो पुन्हा जेलमध्ये हजर न होता फरार झाला होता.
**२२ वर्षानंतर फरार कैदी पुन्हा जेलमध्ये**(पान ३ वर)



## सुविचार

व्यक्तीया छायेप्रमाणे विरून जातात, पण राष्ट्र मात्र स्थिर आणि शाश्वत टिकून राहते.
– ई. बुर्क

संस्कृत सुभाषित
आत्मानमेव मन्येत कर्तारं सुखदुःखयोः।
तस्माच्छ्रेयस्करं मार्ग प्रतिपद्येत् न त्रसेत्।।
अर्थ : आरोग्य आणि आजार, सुख आणि दुःख यांचे निर्माते आपणच असतो. म्हणून इष्ट व श्रेयस्कर मार्गच नेहमी स्वीकारावा म्हणजे त्रास होत नाही.

# संपादकीय

## असा आहे मध्यप्रदेश पॅटर्न

मध्यप्रदेशमध्ये ओबीसीच्या आरक्षणासंदर्भात ट्रिपल टेस्टची अडचण आली. ट्रिपल टेस्ट शिवाय आरक्षण देता येणार नाही हा निकाल सर्व देशाला लागू झाला. त्यामुळे महाराष्ट्रात ओबीसीशिवाय काही ठिकाणी निवडणूक झाली. मध्यप्रदेश, ओरिसा, कर्नाटकालाही तोच कायदा लागू झाला. त्यावेळी मध्यप्रदेशने अध्यादेश काढला. निवडणूक आयोगाचे काही अधिकार स्वत:कडे घेतले. प्रभागरचना करणे, कुठे आरक्षण देता येईल ते ठरवणे आदी अधिकार मध्यप्रदेशाने स्वत:कडे घेतले. निवडणूक आयोगाकडे केवळ निवडणूक घेण्याचे अधिकार ठेवले. त्यामुळे त्यांना वेळ मिळाला. प्रभाग ठरवणं आणि पुनर्रचना करणे यात वेळ मिळाल्याने ते आता इम्पिरिकल डेटा गोळा करत आहेत.

मध्यप्रदेश सरकारचा ओबीसी आरक्षणाबाबत मोठा निर्णय

मध्यप्रदेश सरकारनं ओबीसी आरक्षणाबाबत मोठा निर्णय घेतला. राज्यात सरळसेवा भरतीमध्ये राज्य स्तरावर तसेच जिल्हास्तरावरील पदांमध्ये ७३ टक्के आरक्षण करण्यात आलं आहे. यासंबंधीचे आदेश सरकारनं गेल्या महिन्यातच जारी केला आहेत. मध्यप्रदेशमध्ये आता ७३ टक्के आरक्षण देण्यात आलं आहे. सरळसेवा पद भरतींमध्ये याचा लाभ उमेदवारांना होणार आहे. यात अनुसूचित जातींना १६ टक्के, अनुसूचित जमातींना २० प्रतिशत, ओबीसींना २७ टक्के तर आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या म्हणजे अल्प उत्पन्न गटासाठी १० टक्के आरक्षण लागू करण्यात आलं आहे. या आदेशानुसार ओबीसींचं आरक्षण ८ मार्च २०१९ आणि ईडब्ल्यूएससाठीचं आरक्षण २ जुलै २०१९ पासून लागू असल्याचं म्हटलं आहे. या सर्व पदांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण ठेवण्यात आलं आहे.

मध्यप्रदेश सरकारनं ओबीसी आरक्षण १४ टक्क्यांहून वाढवत २७ टक्के केलं होतं. सरकारनं सर्व विभागांमधील शालेय शिक्षण, आरोग्य आणि संशोधन विभागांमधील भर्ती वगळता अन्य सर्व विभागांमध्ये ओबीसींचं वाढीव आरक्षण २७ टक्के लागू करण्याचं सांगितलं होतं, मात्र या निर्णयाला मध्यप्रदेश हायकोर्टानं स्थगिती दिली होती.

## उपदेशकथा

इराणचा क्रूरकर्मा बादशहा नादिरशहाने 'बुद्धीचे बळ नि मनगटाची मस्ती' यांच्या जोरावर दिल्लीपर्यंत धडक मारून साम्राज्य विस्तार केला. त्यावेळी दिल्लीच्या तख्तावर मोहम्मदशाहा रंगीले हे होते. या दिल्लीपतीने विजयी नादिरशहाला हत्तीच्या अंबारीत बसवून शहराची सैर घडवण्याचा हुकूम दिला. शाही पीलखान्यातील ऐरावतासारखा उमदा हत्ती हजर झाला. सोन्याची अंबारी, भरजरी झूल, त्याला रुप्याच्या झालरी नि झिरमिल्या, मोत्यांच्या माळा, इराणच्या शहाला हत्ती हे वाहन अपरिचित होते. अंबारीत स्थानापन्न होतो तो त्याला अंबारीपुढे एक शाही हुजऱ्यासारखा दिसणारा इसम बसलेला दिसला. तो बिचारा माहूत होता. 'कोण रे बाबा तू? तुझं काय काम? लगाम माझ्या हाती सोपव नि आपला रस्ता सुधार.' नादिरशहानं फर्माविले. माहूत चमकला. थोडा वेळ थांबला. अखेर धैर्य एकवटून त्याने म्हटले, 'खाविंद, कसूर माफ असावी. हत्तीला लगाम नसतो. माहूतच हातच्या अंकुशानं जनावरावर नियंत्रण ठेवतो.' नादिरला नवल वाटलं. 'आश्चर्य आहे. या अजस्त्र प्राण्याला लगाम नसतो? तर मग मी उतरतो. ज्या वाहनाचा लगाम माझ्या हाती नाही त्यावर मी बसणार नाही. स्वत:ची बहुमोल जिवन दुसऱ्याच्या हाती सोपवणारा हा नादिरशहा नव्हे.' माहुताने इशारत करताच हत्ती झुकला. पुढचे गुडघे टेकले. शाही स्वारी पायउतार झाली.

**कथा उपदेश :** जीवनाची वेसणदोरी त्याने सदोदित स्वत:च्या हाती ठेवली यातच कदाचित त्याच्या यशाची गुरूकिल्ली असेल.

## आजचे पंचांग

| | |
|---|---|
| विक्रम संवत्– २०७८ | योग:वैधृति २४:२७:४९+ |
| शालिवाहन शके संवत्– १९४३ | करण:कौलव ११:२७:५४ |
| संवत्सर – प्लवनाम | करण:तैतिल २४:३१:२२+ |
| अयन– उत्तरायण | सूर्य:कुम्भ |
| मास– फाल्गुन | चन्द्र:वृषभ१२:३०:५३ |
| ऋतु– शिशिर | हिजरी सन् – १४४३ |
| शुक्ल पक्ष | मुस्लिम मास – शाबान |
| तिथि:षष्टी २४:३१:२२+ | तारीख – ४ |
| नक्षत्र:कृत्तिका (अहोरात्र) | जागतिक महिला दिन |

## त्यांच्या वाणीतून....

पुणे शहर आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रप्रेमाच्या प्रेरणेसाठी प्रसिद्ध आहे. पुण्याने शैक्षणिक, संशोधन आणि विकास, माहिती तंत्रज्ञान आणि वाहन उद्योग क्षेत्रात आपली ओळख प्रस्थापित केली आहे. त्यामुळे आधुनिक सुविधा गरजेच्या असून त्यासाठी सुरु करण्यात आलेल्या विकास प्रकल्पांसाठी केंद्र सरकार सहकार्य करेल.
**– प्रधानमंत्री नरेंद्र मोदी**

मुंबईत अनेक ठिकाणी वाहतूक कोंडीची समस्या भेडसावत होती. आता एमएमआरडीए, महानगरपालिका यांसह सर्व संबंधित यंत्रणांच्या माध्यमातून वाहतूक जंक्शनच्या जागेचा कल्पकतेने उपयोग करून वाहतूक सुरळीत केली जात आहे. याचबरोबर नागरिकांसाठीही सुविधा निर्माण केल्या जात आहेत. कलानगर प्रमाणेच मुंबईत सर्वत्र अशा सुविधा निर्माण करून मुंबई सुंदर बनविली जाईल.
**– पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे**

# महिला सक्षमीकरणासाठी ग्रामसभा – आयुष प्रसाद

आंतरराष्ट्रीय महिला दिन हा सामाजिक, आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या महिलांना सक्षम करण्यासाठी साजरा केला जातो. यावर्षी 'उद्याच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आजची लिंग समानता' ही संकल्पना समोर ठेवून हा दिवस जगभरात साजरा करण्यात येत आहे.

जिल्हा परिषदेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम यापूर्वीदेखील राबविण्यात आले आहेत. महिला दिनाच्या निमित्ताने गावतपातळीवर विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात येणार आहे. गेल्या काही आठवड्यांपासून पुणे जिल्ह्यातील ग्रामपंचायतींनी महाफेरफार अभियानांतर्गत प्रॉपर्टी कार्डवर (८ अ) महिलांची नावे समाविष्ट करण्यासाठी विशेष शिबिरांचे आयोजन केले आहे. जिल्हा परिषदेच्या आवाहनाला अनेक घरांमधून उत्साहवर्धक प्रतिसाद मिळाला आहे. विशेष ग्रामसभांमध्ये महिलांना प्रॉपर्टी कार्डचे वाटप करण्यात येणार आहे. महिलांची नावे समाविष्ट करण्यासाठी प्रॉपर्टी कार्डमधील उत्परिवर्तनांचे अर्जही स्वीकारण्यात येतील. स्वामित्व योजनेंतर्गत सर्वेक्षण पूर्ण झालेल्या गावांमध्ये नकाशासह अद्ययावत प्रॉपर्टी कार्ड महिलांना देण्यात येणार आहे. मालमत्तेची मालकी हा सक्षमीकरणाचा महत्त्वाचा पैलू असून त्यादिशेने वाटचाल करण्यासाठी पुणे जिल्हा परिषदेने पुढाकार घेतला आहे.

पुणे जिल्ह्यात सुमारे अडीच लाख महिला बचत गटात सहभागी आहेत. ग्रामसभेच्या माध्यमातून गावात 'एक क्लस्टर एक उत्पादन' कार्यक्रमालाही गती देण्याचा प्रयत्न आहे. सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यपदांपैकी ५० टक्याहिपेक्षा जास्त पदे महिलांकडे आहेत. ग्राम रोजगार सेवक, जलसुरक्षा, तंटामुक्त गाव आदी ग्रामसभांनी निवडून दिलेल्या कार्यकारी पदांवर महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी महिला विशेष ग्रामसभेला अशा व्यक्तींना नामनिर्देशित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

मनरेगा अंतर्गत कामगार अर्थसंकल्प आणि मुद्रांक शुल्क, मालमत्ता कर आणि १५ व्या वित्त आयोगाचा वापर करून ग्रामपंचायतीच्या अर्थसंकल्पावर ग्रामसभेत चर्चा होणार आहे. महिलांना अर्थसंकल्प समजावा आणि महिलांना त्यांच्या दैनंदिन श्रमाची उत्पादकता वाढविण्यास मदत होईल व्हावी असे प्रयत्न आहेत. आर्थिक चर्चेमुळे भविष्यातील नियोजन प्रक्रियेत महिलांच्या विशिष्ट गरजा भागविण्यास मदत होईल.

ग्रामसभेला घरगुती हिंसाचार, बाल लैंगिक अत्याचार, कार्यक्षेत्रावरील लैंगिक छळ रोखणे, सार्वजनिक ठिकाणी महिलांसाठी असुरक्षित क्षेत्रे यांच्याविरुद्ध सक्रिय कारवाई करण्यास सांगण्यात आले आहे. विवाहातील हुंडा प्रथेला प्रतिबंध करणे, अल्पवयीन मुलींचे विवाह करणे आणि लिंग–निवडक गर्भपात किंवा स्त्री अर्भकांचा मृत्यू रोखणे आदी बाबींसंदर्भातदेखील ग्रामसभेच्या माध्यमातून जनजागृती घडवून आणण्यात येणार आहे.

महिलांना दूरच्या अंतरावरून पाणी आणण्याच्या घरगुती जबाबदाऱ्यांपासून मुक्त करणे आणि गावाचा परिसर स्वच्छ व आरोग्यदायी ठेवण्यासासाठी शासनाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीलाही गती देण्यात येत आहे. ग्रामसभेच्या माध्यमातून अंगणवाडी, जिल्हा परिषद आणि अनुदानित शाळा आणि आरोग्य केंद्रे – उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य सेवा केंद्र आणि ग्रामीण रुग्णालय यांच्या कामकाजावर चर्चा घडवून त्यांच्या कामांचे विषणदेखील करण्यात येणार आहे. एकंदरीतचमहिलांसाठीच्या विशेष ग्रामसभेच्या माध्यमातून महिलांच्या समस्या दूर करीत त्यांचे सक्षमीकरण करण्याचा प्रयत्न करीत आहोत. या अनुभवातून महिलांच्या उन्नतीसाठीची पुढील दिशा निश्चितपणे गवसेल असा विश्वास वाटतो.

## गुरु वचन– पंचायतीचा निर्णय

एकदा एक हंस आणि हंसिणी हरिद्वारच्या सुरम्य वातावरणातून भटकत उजाड, निर्जन आणि वाळवंटात आले.

हंसिणी हंसाला म्हणाली की, आपण कोणत्या भागात आलो आहोत? इथे तर पाणी नाही, जंगल आणि थंड हवादेखील नाही. इथे तर आपले जगणे कठीण होईल. भटकताना सायंकाळ झाली तेव्हा हंसाने हंसिणीला म्हटले की, आजची रात्र कशी तरी घालवू या. आपण सकाळी हरिद्वारला परतू या!

रात्र झाली तेव्हा झाडाखाली हंस आणि हंसिणी थांबले होते त्या झाडावर एक घुबड बसले होते.ते जोराने ओरडू लागले.

हंसिणीने हंसाला विचारले अरे इथे तर रात्री झोपू शकत नाही. हे घुबड ओरडत आहे. हंसाने पुन्हा हंसिणीची समजूत काढली की, कशी तरी रात्र घालवू या.आता मला कळले की हा प्रदेश ओसाड आहे.असे घुबड ज्या भागात राहतील तो तर विराण आणि ओसाड राहीलच. झाडावर बसलेले घुबड दोघांचे बोलणे ऐकत होते. सकाळ झाली तेव्हा घुबड खाली आले आणि त्याने म्हटले की, हंसभाऊ माझ्यामुळे रात्री तुम्हाला खूप त्रास झाला मला माफ कर. हंस म्हणाला, काही हरकत नाही, तुझे आभार!

असे म्हणून हंस आपल्या हंसिणीला घेऊन जसाच पुढे निघाला तेव्हा मागून घुबड ओरडले, अरे हंसा माझ्या पत्नीला घेऊन कुठे चाललास? हंस चपापला त्याने म्हटले तुझी पत्नी? अरे , ही हंसिणी आहे, माझी पत्नी आहे. माझ्यासोबत आली होती, माझ्यासोबत जात आहे.

घुबड म्हणाले, चूप बस, ही माझी पत्नी आहे.दोघांचा वाद वाढला. सर्व लोक गोळा झाले. अनेक गावातील जनता बसली. पंचायत बोलावण्यात आली. पंच लोकही आले. त्यांनी विचारले, कशाचा वाद आहे? लोकांनी सांगितले घुबडाचे म्हणणे आहे की, हंसिणी त्याची पत्नी आहे आणि हंस म्हणतोय हंसिणी त्याची पत्नी आहे!

दीर्घ बैठक आणि पंचायतीनंतर पंच बाजूला झाले आणि म्हणाले की, हंसिणी हंसाची पत्नी आहे, ही गोष्ट खरी आहे. मात्र हंस आणि हंसिणी तर आता थोड्यावेळात या गावातून निघून जातील. आमच्यात तर फक्त घुबडच राहील. त्यामुळे निर्णय घुबडाच्या बाजूनेच द्यायचा आहे. मग पंचांनी आपला फैसला सुनावला आणि म्हटले की, सर्व तथ्य आणि पुरावे तपासल्यानंतर ही पंचायत या निष्कर्षावर येते की, हंसिणीची घुबडाची पत्नी आहे आणि हंसाला ताबडतोब गाव सोडून जाण्याचा आदेश देते.

हे ऐकताच हंस हैराण झाला आणि रडू लागला. पंचायतने चुकीचा निर्णय दिला असे ओरडू लागला.घुबडाने माझी पत्नी घेतली! रडत ओरडत तो निघाला तेव्हा घुबडाने त्याला हाक मारली. ऐ मित्र हंस, थांब ! हंसाने रडतच विचारले बाबा आता आणखी काय करणार आहेस? पत्नी तर तू घेतलीच आहेतस. आता काय जीव घेणार?

घुबड म्हणाले, नाही मित्रा, ही हंसिणी तुझी पत्नी होती आणि आहे! मात्र काल रात्री जेव्हा मी ओरडत होतो तेव्हा तू तुझ्या पत्नीला म्हणाला होतास की, हा प्रदेश विराण आणि ओसाड आहे कारण इथे घुबड राहतो! मित्रा,हा प्रदेश विराण आणि ओसाड तो इथे घुबड राहता म्हणून नाही तर, इथे असे पंच राहतात जे घुबडाच्या बाजूने निर्णय देतात.

स्वातंत्र्याच्या एवढ्या वर्षानंतरही आपल्या देशाच्या दुर्दशेचे मूळ कारण बहुधा हेच आहे की, आपण आपला निर्णय घुबडांच्या बाजूने सुनावला आहे. त्याला आपणच जबाबदार आहोत.

# असा आहे 'केन्सिंग्टन पॅलेस'चा इतिहास

लंडन येतील केन्सिंग्टन पॅलेस येथे ब्रिटीश शाही खानदानाच्या अनेक पिढ्यांतील सदस्यांनी वास्तव्य केले असून, सध्या या ठिकाणी राणी एलिझाबेथचे नातू प्रिन्स विलियम, त्यांची पत्नी कॅथरीन मिडलटन त्यांच्या तीन अपत्यांसह वास्तव्य करीत आहेत. एके काळी याच राजनिवासामध्ये प्रिन्सेस डायना यांचेही वास्तव्य असे. या राजनिवासाची इमारत दोन मजली असून, याचे निर्माण चारशे चौदा वर्षांपूर्वी, १६०५ साली करण्यात आले होते. केन्सिंग्टन पॅलेसला पूर्वीच्या काळी नॉटिंगहॅम हाऊस या नावाने ओळखले जात असे. ब्रिटनचे राजे तिसरे विलियम आणि राणी मेरी यांनी हे निवासस्थान १६८९ साली खरेदी केले. राजे तिसरे विलियम यांना दम्याचा विकार असल्याने त्यांना थेम्स नदीच्या नजीक असलेल्या निवासस्थानी असलेले दमट हवामान मानवत नसे. त्यामुळे त्यांनी नॉटिंगहॅम हाऊस खरेदी केले. त्यानंतर शाही दाम्पत्याच्या गरजा लक्षात घेता या निवासस्थानामध्ये अनेक बदल करण्यात येऊन याचे नामकरण केन्सिंग्टन पॅलस असे करण्यात आले. याच निवासस्थानामध्ये राणी व्हिक्टोरियाचा जन्म झाला. व्हिक्टोरियाचे बालपण याच राजवाड्यामध्ये गेले असून, तिची आणि तिचे भावी पती प्रिन्स अल्बर्ट यांची प्रथम भेटही याच वास्तूत झाली. कालांतराने व्हिक्टोरिया आणि प्रिन्स अल्बर्ट विवाहबद्ध झाले, आणि त्यांना नऊ अपत्ये झाली. राणी व्हिक्टोरियाच्या काळामध्ये केन्सिंग्टन पॅलेस मोडकळीला आले होते. मात्र राणीने संसदेकडून ठराव मंजूर करून घेत या निवासस्थानाच्या नूतनीकरणाला सुरुवात करविली. १९६०च्या दशकामध्ये राणी एलिझाबेथची धाकटी बहिण केन्सिंग्टन पॅलेस येथे वास्तव्यास होती. तिच्या वास्तव्याच्या दरम्यान या शाही राजनिवासाने अनेक शानदार मेजवान्या पाहिल्या.

१९८०–९०च्या दशकामध्ये प्रिन्सेस डायनाचे वास्तव्य केन्सिंग्टन पॅलेसमध्ये असून, प्रिन्स विलियम आणि प्रिन्स हॅरी यांचा बालपणीचा काळ प्रिन्सेस डायनाच्या देखरेखीखाली याच राजनिवासामध्ये गेला आहे. १९९७ साली प्रिन्सेस डायनाचा अपघाती मृत्यू झाल्यानंतर ब्रिटीश नागरिकांनी डायनाच्या स्मृतीप्रीत्यर्थ लाखो फुलांचे गुच्छ केन्सिंग्टन पॅलेसच्या प्रवेशद्वाराशी आणून ठेवले होते. आताच्या काळामध्ये केन्सिंग्टन पॅलेस येथील अपार्टमेंट १ अ राणी एलिझाबेथने प्रिन्स विलियम आणि त्यांची पत्नी केट यांना भेट दिले असून, या अपार्टमेंटमध्ये एकूण वीस कक्ष आहेत. एके काळी याच अपार्टमेंटमध्ये राणी एलिझाबेथ यांची बहिण प्रिन्सेस मागरिट यांचे वास्तव्य असे.

## राशिभविष्य ०८ मार्च

मेष
: शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पश्चिम
उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

वृषभ : शुभ रंग:काळा, शुभ दिशा :पश्चिम
कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल.

मिथुन : शुभ रंग:लाल, शुभ दिशा: दक्षिण
व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

कर्क : शुभ रंग:निळा, शुभ दिशा:दक्षिण
प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा.

सिंह : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:उत्तर
संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्याघेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले. शक्यतो प्रवास टाळा.

कन्या : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: उत्तर
लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

तुळ : शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:उत्तर
नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील.

वृश्चिक : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम
जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

धनु : शुभ रंग :जांभळा, शुभ दिशा :पश्चिम
सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

मकर: शुभ रंग:पिवळा,शुभ दिशा: उत्तर
राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

कुंभ : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: दक्षिण
व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही.

मीन : शुभ रंग :लाल,शुभ दिशा:पश्चिम
आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**०८ मार्चला जन्मलेल्या लोकांचा भविष्य**
स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर शनि व नेपच्यूनचा प्रभाव आहे. सतत कार्यमग्न रहाणे हा तुमचा स्वभाव आहे. एकदा ध्येय निश्चित केले की ते साध्य होईपर्यंत चिकाटीने तुम्ही त्याचा पाठपुरावा करता. तुम्ही नेहमी भावी परिणामांचा विचार करून काही माणसे तुम्हाला चिक्कू वा कंजूष समजतात. तुम्ही मनाने हळवे आहात. लोकांच्या सुखदुःखाविषयी तुम्हाला आस्था असते. पण कुणी त्या विषयी सल्ला मागायला आल्याखेरीज तुम्ही त्याची इतरत्र वाच्यता करीत नाही. जीवनातल्या गूढ गोष्टींविषयी तुम्हाला आकर्षण असते.

इतरांनी तुमच्यासारखेच शिस्तशीर, वक्तशीर असावे ही तुमची अपेक्षा पुरी होईलच असे नाही. लोकांना सतत नियमांच्या चौकटीत बसवण्याऐवजी त्याची वैयाक्तिक अडचण जाणून घ्या. कॅल्शियमच्या कमतरतेमुळे सांधेदुखी हाडाचे विकार उद्भवतील. दूध नियमित घ्या. शीतपेये, आंबट पदार्थ वर्ज्य करा.

कार्यक्षेत्र : स्वतंत्र व्यवसायापेक्षा नोकरीकडे तुमचा कल अधिक असतो. पोलाद, खनिजे, चामड्याच्या वस्तू, तेले, बांधकाम साहित्य या क्षेत्रात तुम्हाला चटकन प्रवेश मिळेल. मन लावून काम करण्याच्या वृत्तीमुळे वरिष्ठ सतत तुमच्यावर अवलंबून राहतील. शासकीय व खाजगी उद्योगधंद्यात तुमची प्रगति थोडी मंदगतीने पण स्थायी स्वरूपाची होईल. व्यवस्थापनविषयक किंवा कायद्याचे सल्लागार म्हणूनही काम करू शकाल. पुराणवस्तू खातेही अनुकूल ठरेल.

प्रणयी जीवन : उतारवयाची आर्थिक दृष्ट्या नीट व्यवस्था झाल्याखेरीज तुम्ही सहसा लग्नाचा विचार करीत नाही. अतिचिकित्सेमुळेही लग्न लांबणीवर पडते. तुमचे काही विचार लोकांना कालबाह्य जुनाट वाटतात. पैशाची उधळपट्टी तुम्हास आवडत नसल्याने एप्रिल २१ ते मे २० दरम्यानचा जोडीदार टाळा. मनोवृत्ती प्रफुल्लित राखण्यासाठी जून २१ ते जुलै २० दरम्यानची व्यक्ती निवडा.

वर्षफळ : आपल्या मनाप्रमाणे आयुष्याला आधार देण्याची महत्वाकांक्षा पूर्ण होईल. प्रकृतीही समाधानकारकपणे साथ देईल. फेब्रुवारी मार्च मध्ये नव्या जागेचे स्वप्न साकार होईल. एप्रिल मध्ये व्यवसायानिमित्त प्रवास होतील. मुलांच्या प्रगतीचा आलेख उंचावेल. मे जून मध्ये तरूण पिढीशी संवाद साधणे कठीण जाईल. जुलै मध्ये छंद जोपासू शकाल. परिचयाचे रूपांतर प्रेमभावनेत होण्याची शक्यता आहे. ऑक्टोबर मध्ये दूरदृष्टीने घेतलेले निर्णय यशस्वी ठरतील. लोकप्रियता वाढेल.

महत्वाचे वर्ष : ८, १७, २६, ३५, ४४, ५३, ६२, ७१.

भाग्यरत्न : निलम

याच तारेखेची व्यक्ती : चिं. त्र्यं. खानोलकर

## रामविचार महाशब्दकोड

**आडवे**

**शब्द**
१. भारताचे माजी रेल्वेमंत्री
७. अकस्मात
९. दोन मैलांचे अंतर
११. प्रत्येक, शंकर
१२. प्रत्येक वर्षी
१४. पळून जाणे
१५. मोठे शहर, गाव
१६. कविता लिहणारा
१७. हट्टी
२०. फोडमधील द्रव
२१. रंग
२२. वारा, हवा
२३. कायदेशीर
२६. लाजीरवाणे
२७. हिचा 'एकच प्याला' अनेक कुटुंबांची वाहताहत करणारा
२९. फोल, व्यर्थ
३०. कारस्थानी
३२. बेचव
३४. 'बहिरी' शिकारी पक्षी
३६. मृत्यू नसलेला
३७. तापापूर्वीचे अंग मोडून येणे
३८. नमस्काराचा एक शब्द
४१. पाप
४३. कोणत्याही गोष्टीतील 'अर्थ' (ला.)
४४. बैठक
४५. प्रमाणपत्र
४६. छातीत होणारी आग
४७. मऊ
४८. खोकला
५१. श्रावणी शेंगभाजी
५१अ. अफवा, वावडी
५२अ. 'एअर इंडिया'चे बोधचिन्ह
५३. तारणहार
५४. परिचय
५६. क्रिकेटमधील शून्य (इंग्रजी)
५७. बाजू, पक्ष
५८. गावगप्पांचे ठिकाण
६०. पगार
६२. ओरखडा
६४. छोटे चर्मवाद्य
६६. कशा प्रकारचा
७०. मौज, गंमत
७०अ. दोन वेळा म्हटल्यास एक देशी खेळ
७१. एक द्विदल धान्य
७२. शर्करा
७३. बातमी (हिंदी)
७४. पावलाचा खालचा भाग
७६. लहान मूल
७८. केवड्याचे रान
७९. धुणे
८०. आवरणातील छोटासा तुकडा
८१. यथेच्छ

**उभे शब्द**
१. संगोपन
२. तीन तास
३. तात्पर्य
४. आपसातील युद्ध
५. किंमत
६. वस्ती
८. चहा पिण्याचे जोडसाधन
९. कोकिळ (हिंदी)
१०. खळबळजनक
११. केसांची बट
१६. कान
१८. गंध
१९. केविलवाणा
२१. जेवणापूर्वी म्हणण्याचा श्लोक– '--- नाम घ्या श्रीहरीचे'
२२. घोडा
२४. करुणा, कीव
२५. दागदागिने
२७. सेवक
२८. विजयादशमी
३१. पुन्हा
३३. फळातील द्रव
३५. चाणक्यनिती
३७. पंकज
३८. ढीग
३९. चिंतन
४०. कलावंत
४२. सत्व
४३. राजनीतीशी संबंधित
४४. बोंबाबोंब, हाकाटी
४९. समानता
५०. पटाईत, निष्णात
५२. कढी, मठ्ठा, लस्सी असे याचे कितीतरी प्रकार!
५५. जखमेवरचा पापुद्रा
५९. आश्चर्य
६१. नजरेचा पहारा
६३. श्रीरामाचे स्तोत्रकवच
६५. न्याहारी
६७. कणीदार
६८. कौशल्य
६९. वस्तू, माल
७४. शरीर
७५. रस्ता, मार्ग
७६. कठीण प्रसंग
७७. विडा



# एक पाऊल स्त्री सक्षमीकरणासाठी

शक्ती, संस्कृती, प्रगती, प्रकृती सर्वांत ती चा उल्लेख होत असतो. आज स्त्री प्रत्येक क्षेत्रात यशाचे शिखर पादक्रांत करीत आहे. असे एकही क्षेत्र नाही की जेथे महिलांनी त्यांच्या यशाची मोहर उमटवलेली नाही.असे असले तरी काही महिलांना विविध कारणांमुळे अपेक्षित प्रगती करता येत नाही. काहींना सामाजिक स्तरावर अडचणींना सामोरे जावे लागते. तर काही कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडतात. अशा माहिलांना त्यांच्या अडी अडचणीवर मात करुन सक्षम करण्यासाठी शासन स्तरावर विविधयोजनांच्या माध्यमातून मदत केली जाते. त्यासाठी विविध योजना महिला व बाल विकास विभगामार्फत राबविल्या जातात. त्यातील काही योजनांची ही ओळख.

मनोधैर्य योजना : महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र संकीर्ण-२०११ प्र.क्र. ६/का-२, दि. २१.१०.२०१३ अन्वये बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार व सिड हल्ल्यातील पिडीत महिला व बालकांना किंवा त्यांच्या वारसदारांना अर्थ सहाय्य करण्यासाठी व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाने मनोधैर्य योजना सुरु केली आहे. दि.१ ऑगस्ट २०१७ पासुन ही योजना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या माध्यमातुन अंमलबजावणी करण्यात येते. पिडीत महिला, बालक व त्यांच्यावारसदारांना गरजांनुसार वैद्यकीय मदत, निवारा, मानसोपचार तज्ञांची सेवा इत्यादी आधार सेवा उपलब्ध करुन त्यांचे पुनवर्सन करण्याचे काम करण्यात येते.

जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन : शा.नि.क्र.२०१३/११ दि.४ मार्च २०१३ च्या शासन निर्णयानुसार समस्या ग्रस्त व पिडीत महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व त्यांच्या हक्कांचे संरक्षण होवून न्याय मिळावा या करीता जिल्हा तसेच तालुकास्तरावर महिलांसाठी विशेष लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार तालुका स्तरावर प्रत्येक तहसिल कार्यालयात महिन्याच्या चौथ्या सोमवारी आणि जिल्हाधिकारी कार्यालयात दर महिन्याच्या तीसऱ्या सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते.

शासकीय महिला राज्यगृहे : १६ ते ६० वर्ष वयापर्यंतच्या निराधार, निराश्रित, परित्यक्ता, कुमारी माता, संकटग्रस्त व अत्याचाराला बळी पडलेल्या महिलांना आश्रय, संरक्षण व मुलभूत सुविधा पुरवून त्यांचे नोकरी, व्यवसाय आणि विवाह द्वारे पुनर्वसन करण्याकरीता महिला राज्यगृह कार्यरत आहेत. या महिला राज्यगृहात कोर्टामार्फत, पोलसांमार्फत, स्वेच्छेने इतर संस्थेतून बदलीवर गरजू महिला प्रवेश घेऊ शकतात.

महिला संरक्षण गृहे : अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम १९५६ अन्वये पोलिसांनी वेश्या व्यवसायातून सुटका केलेल्या महिलांना व स्वेच्छेने दाखल होण्याऱ्या महिलांना संरक्षण देऊन पुर्नवसन करण्याकरीता शासनातर्फे संरक्षण गृहे चालविण्यात येतात.

शुभमंगल सामुहीक / नोंदणीकृत विवाह योजना : गरजु शेतकरी/शेतमजुर विधवा महिलांच्या मुलींच्या विवाहासाठी ही योजना असुन या योजनेअंतर्गत प्रति लाभार्थ्याला १०,०००/- रु.आर्थिक मदत करण्यात येते. सदर सुधारीत योजना जिल्हा नियोजन समिती मार्फत राबविली जाते.

वन स्टॉप सेंटर : संकटग्रस्त महिलांना तातडीने मदत (निवारा), वैद्यकीय सुविधा, समुपदेशन, पोलीस मदत व न्यायालयीन कामात मोफत विधीज्ञ सेवा तात्काळ मिळण्यासाठी व संकटग्रस्त महिलांना तातडीने मदत मिळण्याचे उद्देशाने केंद्र शासन पुरस्कृत (जपश डीं डीळीळी उशपींशी) सखी हि योजना केंद्र शासनाकडुन राज्यात राबविण्यात येत आहे. सदर वन स्टॉप सेंटर योजना जालना जिल्हयात सुरु असुन त्याचे कार्यालय जिल्हा सामान्य रुग्णालय या ठिकाणी कार्यरत आहे.

घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५: सदर कायदा केंद्र शासनाच्या दि.१७.१०.२००६ च्या अधिसुचनेद्वारे दि. २६.१०.२००६ पासुन देशभरात अंमलात आणला आहे. कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण व्हावे या करिता जिल्हा महिला व बाल विकास विभागामार्फत गरजु महिलांना समुपद-ेशन, वैद्यकीय सुविधा आणि कायदेविषयक मदत मिळवुन देण्यात येते.

केंद्र शासनाच्या योजना :

नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृहे २) अल्पमुदती निवारा गृह

ब) बाल विकासाच्या योजना :-

बाल न्याय ( मुलांची काळजी व संरक्षण ) अधिनियम २००० अंतर्गत योजना सुधारित अधिनियम २००६ अन्वये बालगृहे, बालकाश्रम, बालसदन, अनाथालय यांना बालगृहे म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

बालगृह (शासकीय / स्वयंसेवी) :- काळजी व संरक्षणाची गरज असणारे, अनाथ, एक पालक, बेघर, निराश्रीत बालकांना निवारा व शिक्षण मिळावे याकरिता बाल कल्याण समितीच्या आदेशाने अशा गरजु बालकांना बालगृहामध्ये प्रवेश देण्यात येतो.

निरीक्षणगृहे (शासकीय / स्वयंसेवी ) :- वरील अधिनियमामधील तरतूदी नुसार पोलीसांचे मार्फत ताब्यात घेतलेले विधी संघर्षित बालक तसेच बालन्याय मंडळाच्या आदेशानुसार संरक्षणाची गरज असलेल्या मुलांना निरीक्षणगृहात, बालगृहात ठेवण्यात येते.

अनुरक्षणगृहे : निरीक्षण, बालगृहातील मुदत संपण्यास एक वर्षाचा कालावधी असलेल्या निराधार निराश्रीत बालकास तीन वर्षापर्यंत त्यांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने येथे ठेवण्यात येते.

बाल संगोपन योजना : अनाथ बालकेव निराश्रित बालकांना संस्थेत दाखल करुन घेण्याऐवजी कौटूंबिक वातावरणात त्यांचे संगोपन व विकास होण्यास संधी उपलब्ध करुन देण्यात येते मुलांसाठी कुटूंब मिळवून देण्यासाठी ही योजना कार्यरत आहे.सदर योजने अंतर्गत प्रत्येक मुलाला शैक्षणिक मदत म्हणुन ११०० रु. दरमहा थेट बालकांच्या खात्यात अनुदान वितरीत करण्यात येते. कोविड-१९ मध्ये एक किंवा दोन्ही पालक गमावलेल्या बालकांना देखील या योजनेचा लाभ देण्यात येत आहे.

दत्तक योजना : बाल न्याय अधिनियम २०१५ नुसार काळजी आणि संरक्षणाची गरज असणाऱ्या बालकांना कुटुंब मिळवुन देण्याकरीता ही योजना असुन हि सर्व प्रक्रिया कारा गाईडलाईन नुसार ऑनलाईन पध्दतीने करण्यात येते.ु.लरीर.ळप या साईटवर अधिक माहिती मिळु शकते.

केंद्र शासनाच्या योजना : १) रस्त्यावरील बालकांसाठी योजना २) शिशू गृह

इतर उपक्रम

जिल्हा बाल संरक्षण कक्ष :

जिल्हयातील बालकांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे, काळजी आणि संरक्षणाची गरज असणाऱ्या बालकांना विविध शासकीय योजनेचा लाभ मिळावा याकरीता जिल्हा बाल संरक्षण कक्ष स्थापन असुन या अंतर्गत बालकांसाठी विविध उपक्रम राबविले जातात.

कोविड-१९ मुळे दोन्ही पालक गमावलेल्या एकूण १० बालकांना महाराष्ट्र शासनाच्या नविन योजनेअंतर्गत ५ लक्ष रु. मुदतठेव स्वरुपात लाभ मिळवुन देण्यात आला आहे.

तसेच केंद्र शासनाच्या झच उठए अंतर्गत १० लक्ष रु. मदतीकरिता ११ बालकांचे परिपुर्ण प्रस्ताव ऑनलाईन सादर करण्यात आलेले आहे.

कोविड- १९ मुळे एक किंवा दोन पालक गमाव-लेले बालके तसेच इतर काळजी आणि संरक्षणाची गरज असणारी बालके अशी एकूण ४५३ बालकांना बालसंगोपन योजनेअंतर्गत दरमहा ११०० रु. अनुदान देण्यात येते.

अपराधी परिवीक्षा अधिनियम १९५८ : या अधिनियमात पहिल्यांदाच गुन्हा केलेल्या ज्या गुन्हयासाठी फाशी किंवा जन्मपेठेची शिक्षा नाही अशा गुन्ह्याकरिता शिक्षा न करता करागृहात पाठविण्यापेक्षा जिल्हा परिवीक्षा अधिकारी यांच्या देखरेखीखाली सोडण्यात येते

राज्य महिला आयोग : स्त्रियांवरील अन्यायाचे निराकरण होऊन त्यांना विकासासाठी दिशा उपलब्ध होण्यासाठी महाराष्ट्र शासनाने राष्ट्रीय महिला आयोगाप्रमाणे महाराष्ट्र महिलाआयोगाची स्थापना केली आहे.

महिला व बाल विकास विभाग अंतर्गत पुरस्कार : १) पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार- (राज्यस्तरीय, विभागीय स्तरावर (स्वयंसेवी संस्थांना, जिल्हास्तरीय) २) राष्ट्रीय शौर्य पुरस्कार ३) नारी शक्ती

पुरस्कार.

संकलन

अमोल शिवकांत महाजन

जिल्हा माहिती कार्यालय,

जालना.

# असुरक्षित महिला

आज देशाच्या परिस्थितीचा विचार केला, तर महिला असुरक्षित आहेत. ज्या देशात एका महिलेच्या शीलरक्षणाच्या सूत्रावरून रामायण, महाभारत घडले, त्या देशात आज प्रतिदिन शेकडो महिला अत्याचाराच्या बळी ठरत आहेत. 'नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरो'च्या आकडेवारीनुसार वर्ष २०१९ मध्ये भारतात महिलांवरील हिंसाचाराच्या संदर्भात ४.०५ लाख घटनांची नोंद झाली. यातील ३० टक्के घटना या घरगुती हिंसाचाराच्या आहेत, तर ८ टक्के घटना बलात्काराच्या आहेत.'ऑक्सफेम' या जागतिक विश्लेषण संस्थेने भारतात प्रत्येक १५ मिनिटाला एका मुलीवर बलात्कार होत असल्याचे म्हटले आहे. देशात वर्ष २०१८ मध्ये बलात्काराच्या ३४ सहस्र घटनांची नोंद झाली. ८५ टक्के प्रकरणात आरोप निश्चित झाले; पण शिक्षा केवळ २७ टक्के लोकांना होऊ शकली, असे या अहवालात म्हटले आहे. धर्मशिक्षणाच्या अभावी अनेक हिंदु युवती आज 'लव्ह जिहाद'ची शिकार होत आहेत.

रामराज्यामध्ये महिला मध्यरात्रीची दागिने घालून एकटी जाऊ शकत असे. आज तशी स्थिती नाही; कारण आज रामराज्य नाही. छत्रपती शिवाजी महाराजच्या काळातही महिलांकडे वाकड्या दृष्टीने पाहणाऱ्या रांझ्याच्या पाटलाला हात-पाय तोडले जाण्याची शिक्षा मिळाली होती. आज त्वरित शिक्षा होणे तर दूरच; पण पीडित महिलेची तक्रारही सहजासहजी नोंदवली जात नाही, ही वस्तुस्थिती आहे. केवळ कठोर कायदे करून ही स्थिती पालटली जाणार नाही, तर त्यासाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न व्हावे लागतील.

शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक सक्षमता

महिलांना खऱ्या अर्थाने सक्षम बनवायचे असेल, तर शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक अशा स्तरांवर उपाय करावे लागतील. प्रसिद्धीच्या स्टंटपायी गाभाऱ्यात घुसल्याने महिलांचे सक्षमीकरण होत नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. महिलांना शारीरिक स्तरावर सक्षम बनवण्यासाठी त्यांना स्वसंरक्षण प्रशिक्षण दिले गेले पाहिजे. शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर त्यासाठी प्रयत्न होऊ शकतात; पण केवळ शारीरिक सक्षमता पुरेशी नाही. प्रसंगांना सामोरे जाण्याचे मनोबल आणि आत्मबल आवश्यक असते. हे बळ साधना आणि धर्माचरण याद्वारेच प्राप्त होऊ शकते. आज अनेक जणी, अगदी विवाहित महिलाही कपाळावर लाल गोल कुंकू लावायची लाज बाळगतात. आधुनिकतेच्या नावाखाली पारंपरिक भारतीय पेहराव सोडून तोकडे कपडे घालतात. अशा प्रकारे उच्छृंखल वागण्याने मनोबल आणि आत्मबल प्राप्त होऊ शकणार नाही, तर हे बळ मिळवण्यासाठी साधनाच करावी लागेल. भक्ती आणि साधनेचे बळ असल्यानेच संत मीराबाई यांच्यावर जीवघेणी संकटे ओढवली, तरी श्रीकृष्णाने त्यांचे अद्भुतरित्या रक्षण केले. भक्तीमध्येच शक्ती आहे, हे लक्षात घेऊन आपली भावभक्ती वाढवायला हवी. कोरोनाच्या महामारीनंतर आज जग मोठ्या आशेने हिंदु धर्माकडे पाहत आहे. हिंदु आचार आत्मसात करत आहे. आपणही अभिमानाने धर्माचरण करून धर्मशक्तीची प्रचिती घ्यायला हवी. 'साधनेद्वारे आत्मतेज जागवणे', हे खरे सबलीकरण आहे, हे लक्षात घ्यायला हवे.

सौजन्य: हिंदू जनजागृती समिती

संकलक : कु. प्रियांका लोणे,

समन्वयक, हिंदू जनजागृती समिती,

औरंगाबाद-जालना

संपर्क क्र.: ८२०८४४३४०१

# 'साधनेद्वारे आत्मतेज जागवणे', हे खरे सबलीकरण !

गेल्या काही वर्षांपासून स्त्री-मुक्ती किंवा महिला सबलीकरण हे विषय चर्चेत आहेत. 'महिलांचे सबलीकरण' हा विषय बहुतांश वेळा आधुनिकीकरण किंवा पाश्चात्त्य अन संस्कृतीविरोधी विचारसरणीच्या प्रभावाने चर्चिला जातो. 'अमर्यादित स्वातंत्र्य म्हणजे मुक्ती' अशी अयोग्य संकल्पना तथाकथित पुरोगामी आणि संस्कृतीविरोधक यांच्याकडून ठसवण्याचा प्रयत्न होत असल्यामुळे आज अनेक महिला, युवती अयोग्य वाटेवर चालल्या आहेत. त्यांना खऱ्या उन्नतीच्या मार्गावर आणायचे असेल, तर अयोग्य संकल्पनांचे जोखड उतरवून टाकून त्यांना योग्य दिशा द्यावी लागेल. ही दिशा संस्कृतीचे अनुसरण आणि धर्माचरण करण्याच्या संदर्भात आहे; कारण साधना करून मिळणारे आत्मतेजच व्यक्तीच्या व्यावहारिक आणि पारलौकिक उन्नतीचा मार्ग प्रशस्त करते.

हिंदु धर्मात महिलांचे स्थान

'भारतीय संस्कृतीत महिलांवर अनेक बंधने होती. अलीकडच्या काळात विशेषत: त्यांना शिक्षण मिळू लागल्यावर महिलांना अनेक अधिकार प्राप्त झाले', असा अपप्रचार अनेक जणांकडून केला जातो; पण अभ्यास केल्यावर वस्तुस्थिती वेगळी असल्याचे लक्षात येते. भारतीय संस्कृतीने किंवा सनातन हिंदु धर्माने कोणावरची अन्याय करण्याची कधीही शिकवण दिली नाही, उलट कायम 'वसुधैव कुटुम्बकम' किंवा 'सर्वेत्र सुखिन: सन्तु' अशी प्रार्थना केली आहे. मनुस्मृतीमध्ये 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता: ।' म्हणजे ज्या ठिकाणी नारीची पूजा होते, तेथे देवता रममाण होतात, असे म्हटले आहे. हिंदु धर्माने महिलांना कधीही अन्य पंथांप्रमाणे उपभोग्य वस्तू मानले नाही कि राक्षस मानले नाही. उलट हिंदु धर्माने स्त्रीला आदिमाया शक्तीचे रूप मानले आहे. विवाहानंतर कोणतीही पूजा पत्नीच्या सहभागाविना पूर्ण होत नाही. हिंदु धर्मामध्ये देवतांची नावेही लक्ष्मी-नारायण, सीता-राम, राधे-श्याम, गौरी-शंकर अशा प्रकारची आहेत. जेथे स्त्रियांना पुरुषांपेक्षाही उंच स्थान दिले आहे, तेथे स्त्री-पुरुष समानतेच्या गोष्टी करणे म्हणजे स्त्रियांचे अवमूल्यन करण्यासारखे आहे. महिलांसाठी एक दिवस नाही, तर प्रत्येक दिवसच हिंदु धर्माने दिला आहे. देवतांची नावे उच्चारतानाही प्रथम देवींना वंदन करणारा धर्म अन्यायकारक आहे, असे म्हणणे हा निवळ हिंदुद्वेष आहे, हे लक्षात घ्यायला पाहिजे.

विद्वान, शूर आणि कर्त्या महिला

भारतीय संस्कृतीत अनेक विद्वान, पराक्रमी, कुशल महिला होऊन गेल्या. महाभारतीय युद्धात काश्मीर राजा ठार झाल्यानंतर त्याची पत्नी यशोमती हिचा राज्याभिषेक स्वत: भगवान श्रीकृष्णाने केला होता. अर्जुनाची एक पत्नी चित्रांगदा मणिपूर राज्याची राणी होती. राम वनवासात निघाले, तेव्हा राजगुरु वसिष्ठ ऋषींनी सीता राज्यकारभार करण्यास कुशल आणि सक्षम असल्याने तिचाच राज्याभिषेक करावा, असे सुचवले होते; मात्र सीतेने रामासह वनवासात जाण्याची अनुज्ञा मागितल्याने तिने राज्यकारभार केला नाही, असा उल्लेख वाल्मीकि रामायणात आहे. तात्पर्य हिंदु धर्माने कधीही स्त्रीला कर्तेपणापासून रोखलेले नाही. पुराणांमध्ये अनेक विदुषींचे उल्लेख आढळतात. गार्गी, मैत्रेयी, लोपामुद्रा आदी विदुषी वेद-शास्त्रामध्ये पारंगत होत्या. माता कैकेयीचे वर्तन कसेही असले, तरी दशरथ राजासह कैकेयीही युद्धात शस्त्र हाती धरून लढाई करत असल्याचे वर्णन आहे. अलीकडच्या काळातील उदाहरण पाहायचे म्हटले, तर राणी लक्ष्मीबाई या युद्धशास्त्रात पारंगत होत्या. देशप्रेमाने ओतप्रोत असल्यानेच चिमुकल्या बाळाला पाठीला बांधून त्या युद्ध लढायला गेल्या. शहाजीराजे कर्नाटकमध्ये असतांना राजमाता जिजाई यांनी पुणे जहागिरीचा राज्यकारभार सांभाळला. छत्रपती राजारामाची पत्नी राणी ताराबाई यांनी कर्त्या होऊन कोल्हापूर संस्थान स्थापन केले होते. अहल्याबाई होळकर पतीनिधनानंतर होळकर घराण्याच्या कर्त्या झाल्या होत्या. थोडक्यात शूर-वीर, विद्वान महिलांची परंपरा भारताला लाभली आहे.

या परंपरेचे पाईक व्हायचे असेल, तर आपल्यातील गुणांचा विकास करून त्रुटींवर आणि न्यूनगंडावर मात केली पाहिजे. 'तोकडे किंवा पाश्चात्त्य कपडे म्हणजे आधुनिकपणा', 'इंग्रजी बोलणे म्हणजे पुढारलेपण' अशा अंधश्रद्धा झटकून टाकल्या पाहिजेत. स्वैराच-ारासारख्या गोष्टींचा त्याग केला पाहिजे. स्वातंत्र्य आणि स्वैराचार यांमध्ये भेद आहे. तो समजून घ्यायला हवा. कुटुंबव्यवस्था हे भारताचे बलस्थान आहे. स्त्री ही कुटुंबव्यवस्थेचा कणा आहे. हा कणा जेवढा कणखर असेल, तेवढी कुटुंबव्यवस्था सुदृढ राहील. सांस्कृतिक मूल्यांची जोपासना स्त्रियांनी अधिक प्रमाणात केली आहे. आज जगभरातील लोकही 'बॅक तो मदरहूड' म्हणत कुटुंबव्यवस्था जोपासण्याचा प्रयत्न करत आहेत. आपणही शालीनता, सुसंस्कृतपणा टिकवून ठेवण्याचे संस्कार केले पाहिजेत.

सौजन्य: हिंदू जनजागृती समिती

संकलक : कु. प्रियांका लोणे,

समन्वयक, हिंदू जनजागृती समिती,

औरंगाबाद-जालना

संपर्क क्र.: ८२०८४४३४०१

# युवक काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पदासाठी कुणाल राऊत यांना सर्वाधिक मतं; मुलाखतीनंतर ठरणार अध्यक्ष

**मुंबई,७ मार्च**

युवक काँग्रेसच्या संघटनात्मक निवडणुकीचा निकाल जाहीर झाला असून युवक काँग्रेस प्रद-ेशाध्यक्ष पदासाठी कुणाल राऊत यांना सर्वाधिक मते मिळाली आहेत. कुणाल राऊत हे राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांचे पुत्र आहेत. आज जाहिर झालेल्या निवडणुकीच्या निकालानुसार कुणाल राऊत यांना सर्वाधिक ५,४८,२६७ मते मिळाली आहेत. कुणाल यांचे जवळचे प्रतिस्पर्धी शिवराज मोरे यांना ३,८०,३६७ तर शरण बसवराज पाटील यांना २,४६,६९५ मते मिळाली.

कुणाल राऊत, शिवराज मोरे आणि शरण बसवराज पाटील तीनही उमेदवारांची पक्षातील वरिष्ठ नेत्यांकडून मुलांखत घेतली जाणार आहे. त्यानंतर युवक काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष पदाची घोषणा केली जाणार आहे.

या निवडणुकीसाठी चांगलीच चुरस बघायला मिळाली होती. युवक काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पदाकरिता एकूण १४ उमेदवार रिंगणात होते. त्यासाठी १२ नोव्हेंबर २०२१ ते १२ डिसेंबर २०२१ दरम्यान सदस्यत्व मोहीम राबविण्यात आली होती. कुणाल राऊत यांना सर्वाधिक ५,४८,२६७ मते मिळाली आहेत. तर शिवराज मोरे यांना ३,८०,३६७, शरण बसवराज पाटील यांना २,४६,६९५ मते मिळाली.

कुणाल राऊत हे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांचे पुत्र असून त्यांचा जन्म १७ फेब्रुवारी १९८९ रोजी झाला. विद्यार्थी दशेतच त्यांनी राजकारण आणि समाजकारण यात रस घेण्यास सुरुवात केली. संकल्प या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून त्यांनी समाजकार्यास प्रारंभ केला. त्यानंतर काँग्रेसच्या एनएसयुआय

या विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नासाठी संघर्ष सुरू केला. एन.एस. यु.आय.चे नागपूर जिल्हा उपाध्यक्ष म्हणून त्यांनी २००९ पासून काम करण्यास सुरुवात केली. त्यानंतर ते सलग दोनदा निवडणुकीच्या माध्यमातून युवक काँग्रेसचे सरचिटणीस म्हणून निवडून आले. तसेच २०१८ च्या युवक काँग्रेसच्या संघटनात्मक निवडणुकीत ते युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष म्हणून निवडून आले.

# राष्ट्रीय 'नारी शक्ती पुरस्कार' विजेत्यांचे मुख्यमंत्र्यांकडून अभिनंदन

**मुंबई,७ मार्च**

राष्ट्रीय स्तरावरील 'नारी शक्ती पुरस्कार' विजेत्या महाराष्ट्रातल्या तीन महिलांचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अभिनंदन केले आहे. आंतरराष्ट्रीय महिलादिनी उद्या (८ मार्च) या तिघींसह देशातील २९ महिलांना राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण होणार आहे.

या पुरस्कार विजेत्यांमध्ये महाराष्ट्रातल्या दिव्यांग कथक नर्तिका सायली नंदकिशोर आगवणे, पहिल्या महिला सर्पमित्र वनिता जोगदेव बोराडे आणि सामाजिक उद्योजिका कमल कुंभार यांचा समावेश आहे.

केंद्र सरकारच्या महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्यावतीने 'नारी शक्ती पुरस्कार' दिले जातात. त्यामध्ये यंदा महिला सक्षमीकरण आणि विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या देशातील २९ महिलांना २०२० आणि २०२१ यावर्षांचे 'नारी शक्ती पुरस्कार' प्रदान केले जाणार आहेत.

'राजमाता जिजाऊ माँसाहेब, पुण्योक अहिल्यादेवी, क्रांतिज्योती सावित्रीबाई यांसह अनेक कर्तबगार स्त्रियांनी हा महाराष्ट्र घडवला आहे.

**** पान १ वरून ****

## ओबीसी आरक्षण विधेयक....

होते. सरकारने सर्व विभागांमधील शालेय शिक्षण, आरोग्य आणि संशोधन विभागांमधील भर्ती वगळता अन्य सर्व विभागांमध्ये ओबीसींचे वाढीव आरक्षण २७ टक्के लागू करण्याचे सांगितले होते, पण मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने या निर्णयाला स्थगिती दिली होती.

## मास्क न घातल्यास दंड नाही....

त्यांचे सर्व आदेश बेकायदेशीर असल्याचे उच्च न्यायालयाने आपल्या आदेशात स्पष्ट केले.

याचिकाकर्त्यांच्या वकिलाने न्यायालयाला सांगितले की बेकायदेशीरपणे दंड वसूल करणे ही खंडणी आहे आणि दोषी अधिकारी आयपीसी ३८४, ३८५, ४२०, ४०९, १२० (बी), ३४,१०९ इत्यादी कलमांनुसार जन्मठेपेच्या शिक्षेस पात्र आहेत. नंतर, महाराष्ट्र सरकारने जारी केलेल्या नवीन आद-ेशांमधून मास्कचा दंड काढून टाकण्यात आला आहे.

या बेकायदेशीर वसुलीला मुख्य सचिव सीताराम कुंटे, मुंबई महापालिकेचे आयुक्त इक्बाल चहल, सुरेश काकाणी यांनी साथ दिली आणि त्यांनी दंड वसूल करण्याचे कंत्राट अन्य लोकांना दिले.

मुंबईकरांना मूर्ख बनवून आतापर्यंत १२० कोटींहून अधिक दंड वसूल करण्यात आला आहे. त्याविरोधात अनेक आंदोलने झाली. हे सर्व दंड परत करण्याचे आदेश देण्यासाठी पुढील आठवड्यात एक नवीन जनहित याचिका दाखल केली जाणार आहे, असे इंडियन बार असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष अधिवक्ता नीलेश ओझा यांनी सांगितले.

## लसीकरणाच्या जनजागृतीसाठी चित्ररथाद्वारे प्रसार....

तालुक्यांमध्ये हा चित्ररथ फिरणार असुन कोव्हीड प्रतिबंधात्मक लसीकरणाबाबत जनमानसांमध्ये जनजागृती करणार आहे. या चित्ररथामध्ये कोव्हीड१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी १५ बाबींचे पालन,लसीकरण सर्व घरांचे, संरक्षण जालन्यातील प्रत्येक कुटूंबांचे, लसीकरण केल्यानंतर आवश्यक असणाऱ्या बाबी, १५ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी लसीकरण, कोरोना व्हायरसची लक्षणे आदी संदेश या चित्ररथावर प्रसारित करण्यात आले आहेत.

जालना जिल्ह्यातील दुर्गम भागापर्यंत लसीकरणाच्या जनजागृतीसाठी हा चित्ररथ अत्यंत उपयुक्त ठरणार असुन ज्या भागात लसीकरण कमी झालेले आहे अशा ठिकाणी प्राधान्याने या चित्ररथाच्या माध्यमातुन जनजागृती करण्याच्या सुचनाही जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी यावेळी केल्या.

## जोपर्यंत ओबीसी आरक्षण लागू होत....

करण्यात आलेला आहे असे सांगून यामध्ये ओबीसींचे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये येणारे राजकीय प्रतिनिधित्व सिद्ध होत नाही. हे कारण ठेवून अंतरिम अहवाल नाकारला गेल्यामुळे अस्तित्वात असलेले ओबीसींचे २७ टक्के राजकीय आरक्षण धोक्यात आले आहे. देशात व राज्यात ५२ टक्क्या पेक्षा जास्त छोटे छोटे समूह मिळून विभागलेला ओबीसी समाज राजकीय प्रतिनिधित्वा पासून वंचित राहणार आहे त्यामुळे मध्य प्रदेश आणि छत्त-ीसगडच्या धर्तीवर राज्यात ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका होऊ नयेत अशा प्रकारे विधेयक मान्य करून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसींच्या राजकीय आरक्षणाचे संरक्षण करावे अशीही मागणी करण्यात आली. त्याच बरोबर मागणी मान्य न झाल्यास अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशाराही राज्याचे मुख्यमंत्री मा. उद्धवजी ठाकरे यांना निवेदनाद्वारे समता परिषदेच्या वतीने देण्यात आला. व तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका ओबीसी आरक्षणासहित न झाल्यास अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद ओबीसी समाजाला सोबत घेऊन येणाऱ्या कुठल्याही निवडणुका होऊ देणार नाही व ओबीसी समाज येणाऱ्या निवडणुकांवर बहिष्कार टाकेल अशेही निवेदनात नमूद केले आहे. याप्रसंगी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष नवनाथ (आबा) वाघमारे, युवकचे डॉ. विशाल धानुरे, उपाध्यक्ष सुंदरराव कुदळे, सुधाकर घेर, शहराध्यक्ष दीपक वैद्य, शिवाजी गाडेकर, दशरथ तोंडूळे, तालुकाध्यक्ष सुनील बनकर,ज्ञानेश्वर खरात, प्रा राजकुमार बुलबुले, एड. गायकवाड, शुभम जाधव, राजू घोडके, तुकाराम घेर, शंकर सातपुते, विजय साखरे, दत्ता पवार, शुभम खंदारे, राहुल पहाडे, सागर राऊत, यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## उदय ट्रॅक्टर्स येथे बुकिंग सुरू....

च्या डिस्काउंट बुकिंगचा फायदा घ्यावा असे आवाहन नारायणराव गजर पाटील यांनी केले आहे.

## शहराचा सर्वांगिण विकास हेच ध्येय ....

परिसरातील रस्ते, व अंतर्गत नाल्याच्या कामाचा व हायमास्टचा शुभारंभ ६ मार्च रोजी आ. कैलाश गोरंट्याल, माजी नगराध्यक्षा सौ. संगीता गोरंट्याल यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी नगरसेवक जीवन सले, बबलु सारस्वत, रवि सले, दीपक कावले, आनंत चौधरी, शहागडकर, भौजी, संगम, हरिष नैनबरे, जंजाळ यांच्यासह कॉलनीतील नागरिक उपस्थित होते.

## नवाब मलिकांना १४ दिवसांची....

न्यायालयात हजर करण्यात आलं.

दुसरीकडे नवाब मलिक यांच्या वकिलांकडून न्यायालयीन कोठडीसाठी विरोध करण्यात आला होता. ईडीच्या कारवाईला हायकोर्टात दिलेलं आव्हान प्रलंबित असल्याचा दावा वकिलांनी केला होता. मात्र रिमांडमधील चौकशी पूर्ण झाल्याचं सांगत ईडीने त्यांच्या न्यायालयीन कोठडीची मागणी केली आणि त्यासाठी पीएमएलए कोर्टानं मंजुरी दिली आहे.

## वनराईकडून चार वर्गखोल्या उभारल्या....

नियोजन केले. त्या अंतर्गत बाजार वाहेगाव येथे जिल्हा परिषद प्रशालेतील विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी या ठिकाणी चार वर्गखोल्या उभारण्याचे नियोजन केले होते. त्यानुसार या वर्ग खोल्या तयार करण्यात आल्या. या खोल्यांचे उदघाटन नुकतेच संपन्न झाले. पुणे येथील मुकुंद भूवन ट्रस्ट पुणे यांच्या आर्थिक सहकार्याने व वनराई पुणे यांच्या पुढाकाराने या खोल्या तयार करण्यात आलेल्या आहेत. या उदघाटन सोहळयास वनराईचे रवींद्र धारिया हे प्रमुख उदघाटक म्हणून उपस्थित होते. यावेळी शशांक गराडे, नितीन देसाई, निलेश गुजराती, पवन तणवडे, साईनाथ गलबले यांनी परिसरातील अनेक कामाची पाहणी केली तसेच तालुक्यातील कुसळी या गावाच्या समस्याची पाहणी केली. कुसळीचे सरपंच विष्णू काटे, सतीश हाकवणे, रामकिशन शेळके यांनी यावेळी समस्या सांगितल्यानंतर त्या ठिकाणी काम करण्यात येईल असे सांगण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी बाजार वाहे-गावचे उपसरपंच बाळासाहेब काळे, ग्रामपंचायत सदस्य अंकुश अरसुड, राजेंद्र चौधरी, भाऊसाहेब नरवडे, शालेय शिक्षक समितीचे अध्यक्ष राजेंद्र काळे, कृष्णा काळे, जयराम काळे, बळीराम काळे, नामदेव काळे शिक्षक मंडळी यांच्यासह मोठया संख्येने गावकरी उपस्थित होते.

## नारी शक्तीत समृद्ध राष्ट्र निर्मितीची धमक....

ऑफ जालना इलाइटचे अध्यक्ष रो. श्रीकांत दाड, सचिव रो. शुभम चेचाणी, कोषाध्यक्ष रो. अंकुर भक्कड, प्रकल्पप्रमुख लॉ. कमलकिशोर झुनझुनवाला, लॉ. महावीर गिल्डा, रो. मोनिका दाड, रो. मीनल आबड, रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोचे अध्यक्ष रो. संजय राठी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी अर्चना शर्मा पुढे म्हणाल्या की, एका महिलेने दुसऱ्या महिलेला साथ देण्यामुळे नारी शक्ती निर्माण होते. घरातील कामे सांभाळून महिला प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर होत आहेत, ही समाधानकारक बाब आहे. महिला आणि पुरुष ही जीवनाच्या रथाची

# रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराजच : हभप कु. शिवलीलाताई पाटील

**बदनापूर,७ मार्च**
जगभरात अनेक राजेराजवाडे होऊन गेले, पण रयतेचा राजा असं म्हटलं की समोर छत्रपती शिवाजी महाराजांशिवाय दुसरं कुठलं नाव येत नाही. असे युवा कीर्तनकार शिवलीलाताई पाटील यांनी प्रतिपादन केले. बाजार गेवराई येथील बाजार संकुलनत भगवान जोशी पुण्यतिथी निमित्त कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित कीर्तनातज्ञ हभप कु . शिवलीलाताई पाटील यांचे कीर्तन झाले त्यावेळी त्यांनी शिवचरित्राबरोबरच धार्मिक व सामाजिक पैलूंवर त्यांनी प्रकाश टाकला.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य कैलास चव्हाण, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, संरपच सुरेश लहाने, उपसरपंच मुक्ताबाई जोशी, ग्रामपंचायत सदस्य अशोक सुळे, बाबासाहेब जोशी, मिराबाई देवकर, लताबाई जमधडे, कृष्णा रोडे, रेणुका कान्हेरे, कासाबाई बोर्डे,सोमठाणा संरपच संतोष नागवे, गजानन लहाने, अर्जुन चव्हाण, गजानन कदम, योगेश कान्हेरे, विजय गाडेकर, गणेश कान्हेरे, विलास मोरे, बाबुराव मोरे, नारायण लहाने, श्रीमंत लहाने , राजु कान्हेरे , सोमनाथ जमधडे , संदीप कान्हेरे लक्ष्मण कान्हेरे गणेश होशील , रमेश मोरे , गजानन कावळे, उध्दव जोशी, प्रभाकर जोशी, यांच्यासह मोठ्या संख्येने वारकरी संप्रदायाचे वारकरी या कीर्तकन सेवेत उपस्थित होते. या वेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

१) मारवाडी सम्मेलन व युवामंच च्या वतीने दैनिक रामविचारचे कार्यकारी संपादक यांनी पत्रकर क्षेत्रात केलेल्या कार्यामुळे समाजरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले त्या अनुषंगाने प्रसिद्ध मॉडेल तथा अभिनेत्री अर्चना शर्मा यांच्या उपस्थितीत जागतिक महिला दिनानिमित्त लायन्स क्लब ऑफ जालना आणि रोटरी क्लब ऑफ जालना इलाईट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जननी को सलाम या कार्यक्रमात अर्चना शर्मा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला त्यावेळी लॉ. पुरुषोत्तम जयपुरिया, लायन्स क्लबच्या अध्यक्षा लॉ. मीनाक्षी दाड़, कोषाध्यक्ष लॉ. प्रेमलता लोया, रोटरी क्लब ऑफ जालना इलाइटचे अध्यक्ष रो. श्रीकांत दाड, सचिव रो. शुभम चेचाणी, कोषाध्यक्ष रो. अंकुर भक्कड, प्रकल्पप्रमुख लॉ. कमलकिशोर झुनझुनवाला, लॉ. महावीर गिल्डा, रो. मोनिका दाड, रो. मीनल आबड, रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोचे अध्यक्ष रो. संजय राठी आदींची प्रमुख उपस्थिती होती.
२) उद्योजक सतिशचंद्र बोथरा व महेंद्र बाठिया

# लायन्स क्लबच्या माध्यमातून श्रीराम वाचनालयास मदत करू- प्रांतपाल दिलीप मोदी

**जालना,७ मार्च**
ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालय शासनाकडून मिळणाऱ्या कमी अनुदान व अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करून आपले अस्तीत्व टिकून आहे व वाचकांना चांगल्या प्रकारे सेवा देत आहे या सेवा अधिक उत्तम प्रकारे देण्यासाठी लायन्स क्लबच्या माध्यमातून श्रीराम वाचनालयास मदत केली जाईल असे प्रतिपादन लायन्स क्लब चे प्रांतपाल दिलीप मोदी यांनी ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालयात सदीच्छा भेट प्रसंगी केले.

याप्रसंगी व्यासपीठावर उपप्रांतपाल लॉ.पुरुषोत्तम जुपुरिया,लायन्स कल्ब जालना मेन दाड, ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाच्या अध्यक्षा मीनाक्षी दाड,लॉ.सरला मोदी,विजयकुमार ग्रंथालयाचे अध्यक्ष कैलास बियाणी यांची उपस्थिती होती. चनालयात चे अध्यक्ष कैलास बियाणी यांनी प्रतिपादन करताना म्हणाले कि, ग्रंथालयातील यांनी दिलीप मोदी सत्कार केला. लॉ. दिलीप मोदी मनोगत व्यक्त वातावरण पाहून मन प्रसन्न झाले. ग्रंथ वाचनातून व्यक्तीला ज्ञान मिळते. संस्कृत भाषा सर्व भाषांची जननी आहे.

याप्रसंगी महिला दिनानिमित्त लायन्स क्लबच्या महिलां सदस्य लॉ.संगीता रुणवाल,लॉ.प्रेमलता लोया, लॉ.मीनाक्षी दाड यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाम शेलगावकर यांनी केले तर उपस्थितचे आभार कैलास बियाणी यांनी मानले. याप्रसंगी लॉ.द्वारकादास मुंदडा, लॉ.राजेश भुतिया, लॉ.शाम लोया, लॉ.जयप्रकाश श्रीमाळी, लॉ.बद्रीनारायण बियाणी,जयश्री कुलकर्णी,शकुंतला शेलगावकर,नंदा शेलगावकर,मोहिनी शेलगावकर, सुधाकर भालेराव,श्रीकांत शेल-गावकार,शैलेंद्र बदनापुरकर,प्रमोद जोशी यासह वाचकवर्ग उपस्थित होता.

## रामविचार

### महिला दिनी ..

महिलादिना निमित्त
कामवाली सुट्टी वर
सासू वन्स नि नणंद
पाहुणे आले घरभर
हुकूम वरून ह्यांचा
जेवायला खास कर
संध्याकाळी पार्टीही
आपल्याचं गच्चीवर
मुलाचे शाळेत सभा
आणखी पडली भर
थकूनि गेलेले शरीर
कामे करते भराभर
हेडमॅम मी कामावर
बाकी सारे सुटीवर
ऑफिस जबाबदारी
माझ्याचं एकटीवर
शेजारणी चोळतात
मीठ कसे जखमेवर
कसा साजरा दिवस
विचारतात वरचेवर
सखे दमलीसं का गं
स्वर यांचा कानावर
मोरपीस ते मुलायम
हळूं फिरले मनावर

### संपन्न दिन ...

जागोजागी साजरा करे
महिला दिन जागतिक
शुभेच्छा वर्षाव कागदी
महिला अजून अगतिक
महिला साऱ्या सुरक्षित
आश्वासने ही शाब्दीक
महिलाकशा आघाडीवर
पाजत राहतो बौध्दीक
समानतेचे ढोल बडवा
आकडे फसवे सांखीक
महिला पडल्या एकट्या
पुरूष मिरवती सांघीक
पुरुषाचे कार्य चमचम
दिसते सुंदर अलौकिक
तेजस्वी कितीही महिला
झाकळून जाय लौकिक
शिंपल्यातूनि येई बाहेर
कधी तरी खरे मौक्तिक
करावा विचार सखोल
आचार बनावे मौलीक

हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

# ब्युटी पार्लर चालवणाऱ्या महिलेवर बलात्कार, फेशिअल करण्यासाठी हॉटेलवर बोलावलं अन्...

**जळगाव,७ मार्च**
जळगाव शहरात ब्युटी पार्लर चालवणाऱ्या एका महिलेवर बलात्कार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. इन्स्टाग्रामवर ओळख झालेल्या आरोपीनं फेशिअल करण्याच्या नावाखाली पीडित महिलेला एका हॉटेलवर बोलावून तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला आहे. नराधम आरोपी एवढ्यावरच थांबला नाही, तर त्यानं पीडितेचे अील व्हिडीओ देखील शूट केले आहेत. संबंधित व्हिडीओच्या आधारे आरोपीनं पीडितेला ब्लॅकमेल करत तिच्याकडे ५० हजारांची मागणी केली. याप्रकरणी जळगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

गणेश प्रकाश चौधरी असं अटक केलेल्या ४८ वर्षीय आरोपीचं नाव असून तो जळगाव शहरातील तुळसाई नगर परिसरातील रहिवासी आहे. रामानंदनगर पोलिसांनी त्याला अटक केली असून त्याची कसून चौकशी केली जात आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला एक ब्युटीशिअन असून तिचं जळगाव शहरात ब्युटी पार्लर आहे. आरोपी गणेश यानं काही दिवसांपूर्वी इन्स्टाग्रामवरून पीडितेशी संपर्क साधला होता. यानंतर आरोपीनं ओळख वाढवून पीडितेशी चांगली मैत्री केली होती. यानंतर त्यांच्या प्रत्यक्षात भेटीगाठी देखील वाढल्या.

दरम्यान जानेवारी महिन्यात आरोपी गणेश यानं महिलेला डी मार्ट परिसरात बोलावून मोबाईल भेट दिला. तसेच मला माझ्या नातेवाईकाच्या लग्नाला जायचं आहे. माझं फेशिअल करुन दे, असंही आरोपीनं पीडितेला सांगितलं. त्यामुळे महिलेनं देखील होकार दिला. याचा फायदा घेत आरोपी फेशिअल करण्याच्या बहाण्यानं पीडितेला भुसावळ रस्त्यावरील एका हॉटेलात घेऊन गेला. याठिकाणी गणेशच्या नावानं आधीच खोली बुक होती. याठिकाणी फेशिअल केल्यानंतर आरोपीनं जबरदस्ती करत महिलेशी शारिरीक संबंध ठेवले.

यानंतर घाबरलेल्या महिलेनं आरोपीशी संपर्क तोडला. पण त्यानं अनेकदा माफी मागितल्यानंतर पीडितेनं त्याला माफ केलं. त्यानंतर पुन्हा दोघांत बोलणं होऊ लागलं. फेब्रुवारी महिन्यांत आरोपीनं पुन्हा पीडितेला त्याच हॉटेलमध्ये घेऊन जात लैंगिक अत्याचार केला. या प्रकारानंतर पीडितेनं आरोपीशी कायमचा संपर्क तोडला. पण आरोपीनं दुसऱ्या क्रमांकावरून फोन करून पीडितेला बोलायचं नसेल तर माझा मोबाइल पर दे, असं सांगितलं.

पीडित महिला मोबाइल देण्यासाठी गेली असता, आरोपीनं आपल्याकडील अील व्हिडीओ दाखवून पीडितेला ब्लॅकमेल केलं. तसेच ५० हजार रुपये दे, नाहीतर माझ्याशी संबंध ठेव, अशी धमकी दिली. पण पीडितेनं आरोपीचं न ऐकल्यानं त्यानं ३ मार्च रोजी महिलेच्या पतीला फेसबुकवर मेसेज करून त्याच्याकडे ५० हजार रुपयांची मागणी केली. हा प्रकार पतीला कळाल्यानंतर पीडितेनं रामानंद नगर पोलीस ठाण्यात जाऊन फिर्याद दाखल केली आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून घटनेचा पुढील तपास केला जात आहे.

# पतीला जीवे मारण्याची धमकी देत विवाहितेवर दोघांकडून बलात्कार

**बुलढाणा,७ मार्च**
पतीला जीवे मारण्याची धमकी देत विवाहितेवर दोघांकडून बलात्कार करण्यात आला आहे. महिला दिनाच्या पूर्वसंध्येलाच बुलढाणा जिल्ह्यात ही धक्कादायक घटना घडली आहे. बुलढाणा ग्रामीण पोलीस ठाण्यात पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात संशयितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बुलढाणा येथील एक दाम्पत्य ६ मार्च रोजी धाड येथे जात होते. यादरम्यान, रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास चिखला परिसरात दोन अज्ञात संशयितांनी त्यांची दुचाकी अडवून पतीला मारहाण केली आणि जीवे मारण्याची धमकी देत महिलेवर अत्याचार केले, अशी तक्रार पीडित महिलेने ७ मार्च रोजी बुलढाणा ग्रामीण पोलीस ठाण्यात दिली आहे. या तक्रारीवरून अज्ञात दोन संशयितांविरोधात ३७६ सह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी याप्रकरणी आरोपींचा शोध घेण्यासाठी पथके रवाना केली असून,सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद सोनकांबळे अधिक तपास करत आहेत. दरम्यान, गेल्या काही दिवसांपूर्वी बुलढाणा जिल्ह्यातील लोणारमध्ये कैलास अश्रुबा इंगोले या ३८ वर्षीय व्यक्तीची हत्या झाली होती. ही हत्या अनैतिक संबधातून झाल्याची धक्कादायक माहिती नुकतीच समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी मृत व्यक्तीच्या पत्नीच्या प्रियकराला अटक केली असून पोलीस घटनेचा पुढील तपास करत आहेत. या घटनेने बुलढाणा जिल्ह्यात एकच खळबळ उडाली होती. कैलास यांच्या मृत्यूनंतर अकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली होती. परंतु,

**दैनिक रामविचार लवकरच रंगिन**

# कंडारी येथे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

**बदनापूर,७ मार्च**
तालुक्यातील कंडारी या छोटयाशा गावात स्पर्धा मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी गावातील विविध ठिकाणी असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उपस्थिती होती. या कार्यक्रमातच विविध ठिकाणी यशस्वी कार्यरत असणाऱ्यांचा सत्कारही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. ग्रामीण भागातील येणारे तरुणही विविध ठिकाणी आपल्या कर्तव्याची छाप पाडून यशस्वी ठरत असल्याबददल गावकऱ्यांमध्येही उत्साह होता.

कंडारी खुर्द या गावातील विठठल रुख्माई मंदिर येथे हा कार्यक्रम पार पडला. यावेळी गावातीलच पण विविध ठिकाणी कार्यरत असलेले दुलबा ढाकणे (पोलिस निरीक्षक, ठाणे), देवगिरी महाविद्यालयाचे गायकवाड, जिल्हा परिषद जालना येथील लेखाधिकारी होळकर, देवगिरी महाविद्यालयाचे कमानदार, गणी पटेल, आदर्श महाविद्यालय, सिनगाव येथील बाबासाहेब ढाकणे, मच्छिंद्र ढाकणे, सोपान ढाकणे, पाटबंधारे विभागातील रामकिसन ढाकणे, उध्दव ढाकणे, ज्ञानेश्वर ढाकणे, बदनापूर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. ओम ढाकणे, सदानंद नागरे, लक्ष्मण सोनुने, बंडू सोनराज ढाकणे, विष्णू ढाकणे, प्रल्हाद मोहिते, प्रियंका ढाकणे, दिपाली ढाकणे, रामप्रसाद ढाकणे, कुशीवर्ताबाई खाडे, कृष्णा डोईफोडे आदी यशस्वी ठरलेल्या व्यक्तीमत्वांची उपस्थिती होती. यावेळी त्यांचा सत्कारही करण्यात आला. तर गावातील तरुणांना प्रेरणादायी ठरणार असलेल्या या कार्यक्रमातच स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रही या मान्यवरांच्या उपस्थित सुरू करण्यात आले. गावातीलच दीपाली ढाकणे यांनी पुणे येथे कोरोना काळात उत्कृष्ट कार्य केल्याबददल कोरोना योध्दा म्हणून त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामेश्वर ढाकणे यांनी तर आभार ज्ञानेश्वर ढाकणे यांनी मानले या वेळी सरपंच भरत खाडे, उपसरपंच सदींप राठोड, देवा ढाकणे, सोमनाथ म्हसलकर, साहेबराव ढाकणे, भगवान ढाकणे आदींची उपस्थिती होती.

# कर्जमाफी मधून सुटलेल्या पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार का? : नाना पटोले

**मुंबई,७ मार्च**
शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासाठी राज्यात २०१६ साली छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजना व २०१९ साली महात्मा ज्योतिराव फुले कर्जमाफी योजना जाहीर करण्यात आल्या आहेत. परंतु या दोन्ही कर्जमाफी योजनांमध्ये काही पात्र शेतकऱ्यांना लाभ मिळालेला नाही, त्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे का ? असा प्रश्न महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी उपस्थित केला.

शेतकरी कर्जमाफीसंदर्भात अधिवेशनात प्रश्न उपस्थित करताना नाना पटोले म्हणाले की, शेतकरी कर्जमाफी योजना राबवताना दोन्ही योजनामधून काही शेतकरी पात्र असतानाही त्यांना या कर्जमाफी योजनेचा लाभ मिळालेला नाही. नियमित भरणा करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ५० हजार रुपये प्रोत्साहनपर देण्याची घोषणा केली होती तसेच ज्यांचे कर्ज २ लाखांपेक्षा जास्त आहे अशा शेतकऱ्यांसाठी वन टाईम सेटलमेंटचाही पर्याय दिला होता. यातूनही काही पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळालेला नाही, अशा शेतकऱ्यांना लाभ मिळेल का असा प्रश्न विचारण्यात आला. यावर सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांनी महाविकास आघाडी सरकारच्या कर्जमाफी योजनेबद्दल काही तक्रारी नाहीत आणि या कर्जमाफी योजनेचे उदिष्ट्य सरकार पूर्ण करेल असे उत्तर दिले.


## जाहिरात क्रं ०३/२०२१-२०२२
## ई-निविदा
## वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
## जिल्हाधिकारी कार्यालया समोर, जिल्हा रुग्णालय रोड, जालना

या कार्यालयाच्या अटल भूजल योजनेंतर्गत सन २०२१-२२ अंतर्गत जालना जिल्हयातील जालना व घनसावंगी या तालुक्यातील १२ ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये ट्रेंच कम रिचार्ज शाफ्ट व रिचार्ज शाफ्ट च्या कामाच्या जाहिर निविदा पात्र ठेकेदारांकडुन मागविण्यात येत आहेत. निविदे विषयी सविस्तर माहिती http:/mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**१. ई-निविदा विक्री** – दिनांक ०७.०३.२०२२ स. १०.०० ते २१.०३.२०२२ दु .१५.०० वाजेपर्यंत
**२ ई निविदा सादर करणे** दिनांक ०७.०३.२०२२ स. १०.०० ते २१.०३.२०२२ दु. १५.०० वाजेपर्यंत
**३. ई निविदा उघडण्याचा दिनांक** – दिनांक २२.०३.२०२२ सायं. १७.०० वाजता

स्वाक्षरीत/-
**वरिष्ठ भूवैज्ञानिक,**
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
जालना

संमा/औ/जाहिरात/१९८/२०२१-२२



## जाहिर प्रगटन

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ चे नियम क्र. ६ (३) मधील तरतुदीनुसार जालना आणि जाफ्राबाद या तालुक्यातील ब वर्गातील निवडणुकीस पात्र असणाऱ्या खाली नमुद सहकारी विविध कार्यकारी सेवा संस्थांच्या संचालक मंडळाची निवडणूक सन २००-२३ ते २०२७-२८ या कालावधीकरीता दि.०१.११.२०२१ या अहर्ता दिनांकावरील प्राथमिक मतदार यादी प्रसिध्दीचा कार्यक्रम उक्त नियमानुसार खालील प्रमाणे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

| अ.क्र. | ब वर्गातील सहकारी संस्थेचे नाव |
|---|---|
| १. | विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मयां.निमखेडा खु ता.जाफराबाद जि.जालना |
| २ | विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. किन्ही ता.जाफराबाद जि.जालना |
| ३ | विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. सावरखेडा गोंदण ता.जाफ्राबाद जि.जालना |
| ४ | विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. देळेगव्हाण ता.जाफ्राबाद जि.जालना |
| ५ | वविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या, भाटेपुरी ता.जालना जि.जालना |

**प्राथमिक मतदार यादी प्रसिद्धीचा कार्यक्रम**

| अ.क्र. | तपशील | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | प्राथमिक मतदार यादी प्रसिद्ध करणे | दि.०८,०३.२०२२ | स.११,०० वा. | प्रगत कार्यालय, तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,जालना/ जाफ्राबाद व संबंधीत संस्था यांचे कार्यालयाचे नोटीस बोडांवर |
| २ | प्राथमिक मतदार यादीवर आक्षेप वा | दि.०८.०३.२०२२ | स.११.०० ते ५.०० वा. पर्यंत | जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना यांचे कार्यालय |
| ३ | प्राप्त आक्षेप वा हरकती वर निर्णय देणे | दि.२८.०३.२०२२ | स.११.०० वाजे पर्यंत | अ.क्र. २ मध्ये नमुद केल्याप्रमाण |
| ४ | अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करणे | दि.०४.०४.२०२२ | स.११.०० वाजेपर्यंत | अ.क्र. १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे |

प्राथमिक मतदार याद्या संदर्भात मतदार असलेल्या कोणत्याही सभासदास यादीतील नाव किंवा पत्ता अथवा इतर तपशिल यांच्या संबंधीत कोणतीही अकृती किंवा चुक संबंधी लेखी आक्षेप वा हरकती कारण व पुराव्यासह या कार्यालयात नमुद वेळेत दाखल करता येतील. निश्चित केलेल्या तारखेनंतर आलेला आक्षेप वा हरकती विचारात घेतला जाणार नाही. प्राप्तआक्षेप वा हरकती या कार्यालयाचे सुचना फलकावर दि.२१.०३.२०२२ रोजी स.११.०० वा. प्रसिद्ध करण्यात येतील. प्राप्त आक्षेप अर्जावर दि. २४.०२.२०२२ रोजी स.११.००. वा. सुनावणी घेण्यात येईल, अर्जदार व गैरअर्जदार यांनी सदर सुनावणीचे वेळी उपस्थित रहावे, यासाठी वेगळी नोटीस देण्यात येणार नाही. गैरअर्जदाराला आक्षेपाची माहीती नव्हती ही बाब मान्य करण्यात येणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/*
**(नानासाहेब चव्हाण)**
जिल्हा सहकारी विवरणक अधिकारी
तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना

स्थळ- जालना
दिनांक-०७.०३.२०२२


रामविचार RAMVICHAR Printed, Published and owned by **Sunita Vijay Jain** Printed at Solapur Tarun Bharat Media Limited, Plot No.A-14, Aurangabad industrial Co-Operative Society, Railway Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Published From Plot No.35, Anandivihar, Near Subhadra Nagar, Darga Chowk, Jalna. 431 213 (Maharashtra) Editor- Sunita Vijay Jain( RNI No.40051//84) Contact No. 9423156511, Email ramvichar123@gmail.com